




# वाशिम जिल्हा पोलीस दल



CCTNS प्रकल्प अंतर्गत वाशिम जिल्हा पोलीस दलाला महाराष्ट्रात तृतीय क्रमांक
प्राप्त झाल्याबद्दल मा.पोलीस महासंचालक श्री सतिश माथुर सर हे
जिल्हा पोलीस अधिक्षक श्रीमती मोक्षदा पाटील यांना ट्रॉफी देऊन सन्मानित करतांना...



# वाशिम जिल्हा पोलीस दल



# वाशिम वॉरियर्स

प्रकाशन दिनांक :
२६ जानेवारी २०१८



# मनोगत



वाशिम जिल्हा पोलीस दलाचे वतीने आपणा हाती वाशिम वॉरियर्सची आवृत्ती ठेवताना मला मनस्वी अभिमान वाटत आहे. वाशिम जिल्हा संपूर्ण महाराष्ट्रात जातीय आणि धार्मिक दृष्ट्या संवेदनशील मानला जातो. जिल्ह्याचे भौगोलिक स्थान दुर्गम आहे, औदयोगिक विकासाची वाणवा, उच्च शिक्षणाच्या सोयींचा अभाव यामुळे काहीशा नकारात्मक मन:स्थितीला अधिकारी वर्ग, आत्मविश्वासाची आणि असुरक्षिततेची काहीशी कमी असणारा कर्मचारी वर्ग या सर्वांमध्ये उत्साहाचा व सकारात्मकतेचा संचार करण्यासाठी अतिशय विचारपूर्वक प्रयत्न करावे लागतात. ज्यायोगे त्यांना स्वत:च्या क्षमतेची जाणीव होईल आणि एक चांगला कर्मचारी वर्ग म्हणुन वाशिमचे नाव महाराष्ट्रात होईल, म्हणुनच हे 'वाशिम वॉरियर्स' नाव. ज्यायोगे आमच्यातल्या लढाऊ आणि जिगरबाज कर्मचाऱ्यांना स्वत:चा आवाज लाभेल.

पोलीसांच्या नोकरीमधील ताण-तणावापेक्षा त्यातील संस्थात्मक आव्हानाबद्दलबोलणे मला जास्त आवश्यक वाटते. या अंकातील लेख वाचून अनेक नव्या आणि ठाशीव कल्पनांना कृतीत आणण्याची दिशा आम्हाला सापडणार आहे. आपल्याला सुद्धा आमची ही शब्दरुपी सेवा भावेल आणि आपल्यातलाही सुप्त पोलीस गरजेच्या वेळी प्रकट होईल अशी अपेक्षा मी येथे व्यक्त करते. माझ्या दलातल्या प्रत्येकाची जशी जबाबदारी माझेवर आहे, तसेच त्यांचेकडून असणाऱ्या अपेक्षाही आहेत. आमचे अधिकारी कर्मचारी सर्वार्थाने अधिकाधिक चांगले अधिकारी कर्मचारी बनतील, अशी अपेक्षा मी इथे व्यक्त करते.

जय हिंद !

**मोक्षदा पाटील** (भा.पो.से.)
पोलीस अधिक्षक,
वाशिम

# शुभेच्छा संदेश



दिनांक २६ जानेवारी २०१८ च्या ६९ व्या भारतीय प्रजासत्ताक दिन या शुभदिनी प्रसिध्द होणाऱ्या वाशिम जिल्हयाच्या " वाशिम वॉरियर्स " या विशेषांकाच्या आवृत्तीला शुभेच्छा देतांना मला अंत्यत हर्ष होत आहे.

पोलीसांकडून प्रामाणिक व अथक परीश्रम करुन कामाच्या व्यस्ततेमुळे केलेल्या कामाची प्रसिध्दी न झाल्यामुळे चांगल्या कामगीरीचे मूल्यमापन होत नाही. पोलीस दलातर्फे coffee with police, शांतता समीती, मोहल्ला समीती, पोलीस मित्र या माध्यमातून अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात व समाजातील सर्व घटकामध्ये सलोखा व सौदाहर्य निर्माण करण्यासाठी नाविन्यपुर्ण प्रयोग केले जात आहे. समाजात शांतता प्रस्थापीत व्हावी व कायदा व सुव्यवस्था टिकुन राहावी याकरिता समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे काम वाशिम पोलीस निरंतरपणे अहोरात्र बजावीत आहे याचा मी साक्षीदार असून मला त्याचा रास्त अभिमान आहे. जिल्हयामध्ये सर्व जाती धर्माबाबत सद्भावना बाळगून धर्मनिरपेक्ष व पारदर्शक पध्दतीने कोणताही भेदभाव न करता वाशिम पोलीस दल कर्तव्य बजावत आहे. वाशिम पोलीस दलातर्फे प्रसारीत होणाऱ्या " वाशिम वॉरियर्स " विशेषांकामध्ये नविन माहिती, क्लिष्ट गुन्हयांचा तपास, उघडकीस आणण्याचा प्रयत्नाबाबतची शोधगाथा, शास्त्रोक्त पध्दतीने तपास करुन गुन्हेगारांना शिक्षा मिळवुन देण्यासाठी केलेले प्रयत्न, विविध कल्याण योजना, नविन उपक्रम पोलीसांच्या कलागुणांना वाव देणारे कलावंत पोलीस त्यांचे पाल्य यांचा समावेश या मासिकामध्ये आहे. जनतेच्या मालमतेचे व जिवीताचे संरक्षणासाठी विविध उपाययोजना पोलीसांकडुन राबविल्या जातात व याची माहिती जनतेपर्यंत सहज मार्गाने पोहचविण्यासाठी यथार्थदर्शी माध्यम म्हणुन हे विशेषांक उपयुक्त व मार्गदर्शक आहे.

वाशिम जिल्हा पोलीस दलास कृतिशील व निडर असे नेतृत्व मोक्षदा पाटील,भा.पो.से. यांच्या कॅप्टनशिपमध्ये लाभले आहे. जिल्हयाची कायदा व सुव्यवस्था अतिशय परिश्रमपुर्वक व सखोल विचारांती त्यांनी अबाधित राखली आहे. असामाजिक प्रथा व तत्वांवर कडक कारवाई करताना सर्व समाजात पोलीसांबद्दल सकारात्मक व धडाकेबाज प्रतिमा त्यांनी तयार केली आहे. मी त्यांचे व सर्व अधिकारी - कर्मचारी वृंदांचे मनापासुन अभिनंदन करतो व वाशिम जिल्हा पोलीस राज्यस्तरावर अशीच चमकदार कामगिरी चालू ठेवेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

छ.हि.वाकडे
विशेष पोलीस महानिरीक्षक,
अमरावती परीक्षेत्र, अमरावती.







# 'फिल्ड' वरचे फास्टर फेणे

'सरफरोश' मधला अमीर खान असो किंवा दुर्गाशक्त्ती I.P.S. किरण बेदी असो I.P.S. चे आकर्षण कुणाला चुकलेले नाही. अतिशय कमी वयात मिळणारे जॉबवरचे चॅलेंज, थ्रिल, पब्लीकमध्ये मिळणारी क्रेझ, वर्दीचा रुबाब, सिंघम स्टाईलचा दणका या सर्वांचे शानदार मिश्रण म्हणजे एक गौरवशाली परंपरा जपणारी 'भारतीय पोलीस सेवा' Indian Police Service

या लेखात आपण I.P.S. चे लेणे चढवून प्रशिक्षणाची आणि संवैधानिक पाठबळाची चिलखत लेऊन सज्ज झालेल्या तरुण अधिकाऱ्याच्या 'फिल्ड ' पर्यंत येण्याचा प्रवास पाहणार आहोत. त्यातल्या प्रत्येकाची ' लिडरशिप स्टाईल ' व आपल्या देशासाठी - सिस्टीमसाठी पाहिलेली स्वप्ने घातून त्यांच्या ' फिल्ड ' वर म्हणजे प्रत्यक्षात ' ड्युटी ' वर असतांनाचा प्रवास सुरु होतो.

पहिली पायरी असते ती, ' फिल्ड ट्रेनिंग ' ची रथासारथ्य कसे करावे, हे पुस्तकातून वाचणे वेगळे, आणि प्रत्यक्षात तो रथ हाकून नेणे वेगळे. I.P.S. ऑफीसर जरी थेट वरीष्टपदावर जाऊन बसत असला/असली, तरी या ट्रेनिंगमध्ये त्यांना कॉन्स्टेबल, पी.आय., आर.पी.आय. या पदांचा एकेक आठवडा अनुभव दिला जातो. पोलीस स्टेशनमध्ये ड्युटी वाटप करण्यापासून ते जेल ड्युटीपर्यंतचा अनुभव दिला जातो. पोलीस प्रशासनाचा मुलभूत घटक असणाऱ्या पोलीस स्टेशनचे कामकाज, ताणतणाव, गफलती किंवा अनुकरणीय गोष्टी या सर्वांचा प्रत्यक्ष अनुभव तिथे होतो. मर्यादीत मनुष्यबळ, मर्यादीत सोयीसुविधा, प्रतिकूल परिस्थीती यांना तोंड देवून आहेत. त्या मनुष्यबळाची क्षमता वाढवत, सोयी-सुविधांचा पाठपुरावा करत आपले ' युनिट ' सतत ' बेटर पोलिसिंग 'साठी कटिबध्द ठेवण्याची कला इथूनच शिकायला मिळते.

यानंतर होते आपली पहिली ' पोस्टिंग ' म्हणजेच ASP - Assistant Superintendent of Police / सहाय्यक पोलीस अधिक्षक. चार/ जास्त पोलीस स्टेशन्स मिळून एक सबडिविजन बनते जिचे पर्यवेक्षण व जबाबदारी आपल्याकडे असते. रोज दाखल होणारे गुन्हे, कायदा व सुव्यवस्थेशी संबंधीत सर्वधर्मीय सण-उत्सव, प्रासंगिक आव्हाने, कर्मचारी - अधिकाऱ्यांच्या शिस्तविषयक बाबी तसेच अडचणी या सर्वांचा आढावा घेवून नवनव्या तसेच परिणामकारी पध्दतीने आपली सबडिविजन चालवणे अपेक्षित असते. पहिली पोस्टींग म्हणजे ' पहला खुमार'

असल्याने दणादण धाडी टाकणे, अवैध धंदेवाल्यांना धोपटून काढणे, प्रसंगी ट्रॅफिक सरळ करण्यासाठी सिंघम पध्दत अवलंबणे - यात काही असलेच, तर वरीष्ठ व सामान्य जनता सांभाळूनच घेतात.

यानंतरचा, साधारण दिडेक वर्षानंतरचा चार्ज असतो तो अतिरीक्त पोलीस अधिक्षकाचा (Additional SP) यात मुख्यत्वे संपूर्ण जिल्हयाचा ' क्राईम ', गुन्हे उघडकीस आणणे, कोर्टांमध्ये केसेस टिकवून ठेवण्यासाठी पर्यवेक्षण व उपाययोजना करणे. समन्स - वारंट्स बजावणीवरील देखरेखीपासून ते आपले S.P. नेमून देतील ती कर्तव्ये पार पाडावी लागतात. S.P. पदासाठीची प्राथमिक तयारीच म्हणा ना.

एखाद वर्ष हे कर्तव्य पार पाडलेनंतर आपण ज्या पदासाठी अत्युत्सुक असतो ते पद District Superintendent of Police भुषवायची संधी मिळते. आपणांस ज्या कल्पना होत्या, ज्या प्रकारे आपण आपल्या क्षमतांचा ठसा उमटवू इच्छित होतो - त्याची संपूर्ण करियर मधील ही पहिली पायरी होय. अवैध धंदे नष्ट करुन गोरगरीब बायाबापडयांना थोडासा दिलासा देण्याचा प्रयत्न करणे, एखादी नविन कल्पना राबवून पोलीस व जनतेमधले अविश्वासाचे वातावरण सहकार्यामध्ये बदलणे, संपूर्ण जिल्हयाच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांचे एका रुपात ' कुटूंबप्रमुख ' असणे. त्यांच्या बदल्यांपासून ते पोलीस वसाहतीतल्या पाण्याच्या प्रश्नांपर्यंतचे तुमचे लक्ष असणे इथे अभिप्रेत असते. गंभीर गुन्हे उघडकीस आणणे, कुठल्याही परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे, न्याय मागण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक तक्रारदाराचे समाधान करण्यासाठी त्याच्या डोळयाचे पाणी पुसण्यासाठी आपल्या यंत्रणेकडून काम करुन घेणे, असे खूप काही यात आहे. जिल्हयातील सर्व यंत्रणांशी समन्वय ठेऊन सुप्रशासनात आपले निर्विवाद योगदान ठेवणे, हे एका कलेक्टरकडून जेवढे अपेक्षित आहे. तितकेच S.P. कडूनही आहे.

' युनिट कमांडर ' म्हणजेच 'S.P.' म्हणून सेवा दिल्यानंतर आयुक्तालयात D.C.P. म्हणून SRPF मध्ये ग्रुप कमांडर म्हणून रेल्वे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) (SID) (CID) महाराष्ट पोलीस अकॅडमी, (ATS) इ. अनेक ठिकाणी आवडीनूसार/ आदेशानूसार आपण सेवा देवू शकतो. प्रत्येक पोस्ट कडून शिकण्यासारखे असते, तसेच प्रत्येक पोस्टला आपल्या कर्तृत्वाने - शैलीने सन्मानीत करणे आपले कर्तव्य ठरते.

कालानुक्रमे आणि सर्विसच्या सेवा नियमांप्रमाणे इथून पुढे

DIG - Deputy Inspector General of Police - ( पोलीस उपमहानिरीक्षक )

IGP - Inspector General of Police - ( पोलीस महानिरीक्षक )

ADG - Additional Director General of Police - ( अतिरीक्त पोलीस महासंचालक )

DGP - Director General of Police - ( पोलीस महासंचालक )

या पदापर्यंत एका I.P.S. अधिकाऱ्याचा प्रवास होतो. आपापल्या राज्यातच (केडर) नव्हे, तर केंद्राच्याही सेवेत I.B., RAW, CBI, CPF - Central Police Force जसे की, BSF, SSB, ITBP, CRPF, CISF यांत डेप्युटेशनवर जावून तिथला अनुभव घेण्याची संधी मिळते. तसेच U.N. Missions मध्ये नॉमिनेट होवून परदेशातील पोलीस सेवेत काही काळ सेवा देण्याचीही आगळीवेगळी संधी मिळते.

इतकेच काय, दोन वर्षासाठी परदेशातल्या कुठल्याही विद्यापीठात आवडीच्या विषयात २ वर्षे उच्च-शिक्षण घेण्याची सुंदर संधी मिळते. एकंदरीतच भारतीय पोलीस सेवा ही आव्हानात्मक, रोमहर्षक आणि गौरवशाली परंपरा जपणारी सेवा आहे. राजकीय-सामाजिक-सांस्कृतीक ताणतणाव पचवून, कुठल्याही प्रसंगातून आपल्या अधिपत्याखालील फोर्स ला योग्य दिशेने ओढून नेणाऱ्या अधिकाऱ्यांनी आपल्या खाकी वर्दी बद्दलच्या अभिमानातून घडलेली सेवा म्हणजे - ' भारतीय पोलीस सेवा '.

**मोक्षदा पाटील** (भा.पो.से.)
पोलीस अधिक्षक, वाशिम



## नि:शब्द



स्थळ : विश्रांतवाडी
वेळ : २० : ३०

ऑफीसचे काम तसं संपलं होतं, काही गोष्टी ज्या उद्या होऊ शकत होत्या, त्या बाजुला ठेवल्या होत्या. दिवस तसा हेकटिकच गेला होता. म्हणुन मग घरी जावं व आराम करावा म्हणून निघाले. बी.ई.जी.चा पूल ओलांडून पर्णकुटीपर्यंत पोहचले. आज विशेष ट्रॅफीकही नव्हतं. तेवढयात फोन वाजला.विश्रांतवाडी पो.नि. यांचा फोन होता. तसे वाडी पो.स्टे.शांत,पण मला फोन कसा आला असा विचार करतच फोन उचलला. पी.आय. जरा जड आवाजात बोलत होते, "नमस्कार मॅडम." मी म्हणाले, "हा बोला सुपेकर साहेब, काही महत्वाचे. हो एक चौदा वर्षाच्या मुलाचा खून झाला आहे. कुठे? कोणी केला? ..." असे नाना प्रश्न डोक्यात पॉप-अप होत. होते.

"मॅडम वेरीफाय करत आहोत, पण बहुतेक खून त्याच्या आईनेच केला आहे. ती आपल्या ताब्यात आहे. आणि बॉडी ससुन हॉस्पीटल मध्ये आहे." मी म्हणाले, "ठीक आहे; मी पहिले ससुनला जाते. मग पो.स्टे.ला येते." आईनेच मुलाला मारले हे थोड मला वेगळच वाटलं. आम्ही पर्णकुटीवरुन ससुन हॉस्पीटला निघालो व लागलीच मी डी.सी.पी.सर यांना फोन करुन हकिकत सांगितली ससुन हॉस्पीटल मध्ये त्या चौदा वर्षाच्या मुलाची बॉडी बघून माझ्या तळपायाची आग मस्तकात गेली. त्याचं पूर्ण शरीर काळं-निळं झालं होतं. रक्ताचा एक थेंब नाही. सगळ्या लाकडी बॅटने मारलेल्या खुणा/जखमा. इतकी क्रूर असू शकते का आई? असा प्रश्न पडत होता सारखा. त्याचं पोस्टमार्टम व्हायचं होतं. तीन डॉक्टर त्याचे पोस्टमॉर्टम करणार होते. तेथून थेट पोलीस स्टेशनला आले. पी.आय. यांनी सांगितले त्या मुलाची आई ताब्यात आहे. आपल्या समोर हजर करु कां? मी लागलीच हो म्हणाले. तिला पाहून मी थक्क झाले. जीन्स, टी-शर्ट व जॅकेट घातलेली ती एक सुशिक्षित ३५-४० वयोगटातील बाई होती. तिच्या चेहऱ्यावर तीने केलेल्या गुन्ह्याचं, पापाचं बिलकूल Guilt नव्हतं. तिचा तो भावनारहित, कोरडा, शून्य चेहरा बघून माझा राग अनावर झाला आणि मग पोलीसी खाक्यात मी तिला एक ना अनेक प्रश्न विचारले. "पोटच्या पोराला तु कशी मारु शकते?..."

ती मूळ नागपूरची. नवऱ्यासोबत तिचा घटस्फोट झाला होता. मुलाची कस्टडी गेले दोन वर्षांपासून तिच्या कडे होती. ती दोन वर्षापुर्वीच मुलासह पुण्यामध्ये आली होती. तिचा मुलगा सकस बुध्दीचा पण एका पायाने थोडासा अधू होता. तिने त्याला शाळेत टाकले होते. तो छान शिकत होता.पुढे चालून ती राहत असलेल्या ईमारतीच्या मालकाची व तिची ओळख झाली....पुढे प्रेम.... आणि त्यांचे भेटणे वाढले. आता मुलगा नकोसा झाला. तिचा तो मित्र घरी सुध्दा यायचा. या ना त्या कारणाने ती तिच्या मुलाला सारखी रागवायची, मारायची. तिने त्याला शाळेतुन काढले. ऑफिसला जातांना त्याला घरी लॉक करुन जायची. जेवण पण कमी द्यायची. तिने त्याला एक गेमचा टॅब दिला होता. दिवसभर तो ते खेळायचा. भुक लागली तर तो खिडकीतून शेजारच्या आजीला खायला मागायचा. तिही द्यायची. तिचा मित्र ही घरी यायचा, तो ही त्याला मारायचा. आणि त्या दिवशी त्या दोघांनी त्याला इतकं बॅटने मारलं की नाही सहन करु शकला तो लहानसा गोंडस जीव...

गुन्हा दाखल. दोघेही अटक....

स्थळ :- पिंपरी
वेळी :- सकाळ ९.००

दिवस हा तसा डी.सी.आर. ने चालु होतो. प्रत्येक पोलीस स्टेशनचे पी. आय. दिवसभर दाखल झालेल्या

गुन्ह्याची माहिती फोन करुन सांगतात. मग मी आमचे वरिष्ठांना....अशातच मला पिंपरी पोलीस स्टेशनच्या पी.आय. चा फोन आला. एक सात महिन्याच्या बाळाला आईने पहिल्या मजल्यावरुन फेकून दिले ते बाळ मयत झाले आहे. ३०२ दाखल करीत आहोत. सुन्न करणारा फोन होता. "मी निघते लगेच" असे मी सांगीतले.

मी पोलीस स्टेशनला पोहचले. सकाळची वेळ, त्यामुळे शिवाजी नगर आणि पुढे पिंपरी भरपुर ट्रॅफीक होते. वायरलेसचा सेट अखंड बॅकग्राऊंडला चालु होता. माझ्या डोक्यात अनेक प्रश्न.... पोलीसांची भूमिका ही तशी तृतीय पक्षीच... म्हणावे तर तटस्थ! पण प्रत्येक कृत्याचं ब्लॅक अॅन्ड व्हाईट, बरोबर-चूक यांचे अनुमान लावणे चालूच असते मनामध्ये.

मी आपली माझ्याच मनाची पाठ राखीत होती. कदाचित बाळ आजारी असेल, व्यंग असेल.... त्यामुळे ती 'आई' वैतागली असेल. स्मिता पाटीलच्या उंबरठा सिनेमाची आठवण झाली, बाळासाठी नवऱ्याकडे जावं लागेल... नवरा खूप मारतो. नवऱ्याकडे जायच नाही म्हणुन बाळालाच मारुन टाकते ती. किती सगळ सुन्न आणि गुंतागुंतीच आहे. तेवढ्यात पोलीस स्टेशन आले. बाईला बघितले 'आई' तर म्हणवत नव्हतं तिला. "नको होत बाळ मला... मी सांगितलं होत नवऱ्याला, मला एवढ्यात मूल नको आहे... म्हणून फेकून दिलं गॅलेरीतून मी." सहज सांगत होती ती, फेकुन दिलं!!! लग्नाला तिच्या दोन वर्ष झालेली. नवरा शहरात काम करतो. बाळंतिन झाली. मुलगी होती. म्हणून पिंपरीला माहेरी होती. बाळाचा सांभाळ तिची आईच करायची. बस! नको होत बाळ thats it!! हॉस्पीटल मध्ये गेलो आम्ही. ओ.पी.डी. मध्ये एका पाळण्यात त्या नर्सने बाळ ठेवल होत. इंतक गोड निरागस....गाढ झोपलं होतं. कोठेच जखम नव्हती. मी नर्स ला विचारले, "बाळ खरच....?" नर्स म्हणाली "होय मॅडम, बाळाच्या मेंदूला शॉक बसल्याने आणि इन्टर्नल फ्रॅक्चरमुळे बाळ गेले आहे." बाळाकडे बघितले तर अस वाटांयच आता उठेल ते झोपेतून...

गुन्हा दाखल, आरोपी अटक.

स्थळ :- येरवडा

वेळ :- १९.०० सायंकाळी

मी पो.स्टे.भेटीसाठी येरवड्याला आले होते. पोलीस स्टेशन अभिलेख चेकींग काम चालू असतांना एक मध्यमवर्गीय बाई पोलीस स्टेशनला आल्या. तिच्या दहा वर्षाच्या मुलाचे अपहरण झाले होते. म्हणलं की मला सागर सहाणीची केस आठवली. त्याच्याच घरी होम ट्युशन साठी जो टिचर यायचा त्यानेच अपहरण केलं असावं, असा तिचा अंदाज होता.

अपहरण म्हणलं की, सागर सहाणी केस असं समीकरण झाल होतं! पोलीस स्टेशनचे क्राईम ब्रँच पी.आय. आणि आमचे विभागातून काही चांगले ऑफीसर स्टाफ यांची टीम तयार केली. एक निश्चित प्लॅन करुन शोध मोहिम सुरु झाली. नाकाबंदी, वाहने चेकींग, बिट मार्शल माहिती घेणे, सी.डी.आर. ॲनालिसीस सुरु झाले.

प्रत्येक टीमचे त्याच्या त्याच्या पध्दतीने काम सुरु होते, पण यश मिळत नव्हते... अपहरणकर्त्यांचा कॉल येईल म्हणून आम्ही वाट पाहत होतो. मग त्यास फोनवर काय बोलायचे, कसं बोलायचे याचे एक स्किल असतं. त्यात परिपक्व असलेला स्टाफही सोबत होता. केस इतकी सिरीयस होती की no one wanted to take risk..... रात्रगस्तीचे अधिकारी, कर्मचारी सर्वजण आपले परीने शोध घेत होते. तेवढ्यात हडपसर बिट मार्शल ला एक मारुती८०० गाडी एका निर्मनुष्य रस्त्यावर उभी दिसली. तिथे जाऊन त्यांनी पाहिले तर अपहरण झालेल्या मुलासारखाच मुलगा व संशयित इसम त्या गाडीमध्ये त्यांना दिसले.



# सार्वजनिक विश्वास हाच प्रभावी पोलीसिंगचा आधार



समाजात शांतता राखणे, गुन्हेगारांवर नियंत्रण ठेवणे, कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे ही पोलीस प्रशासनाची मुख्य जबाबदारी असते. आपले कर्तव्य पार पाडतांना पोलीस हे कधीही तासांचा किंवा दिवसांचा विचार करीत नाहीत. आम्हा पोलीसांना कर्तव्य करीत असतांना सण उत्सवाची किंवा नातेवाईकांची पर्वा नसते. पोलीस चोवीस घंटे, तिनशे पासष्ट दिवस फक्त सेवा देण्यासाठी तत्पर असतात. समाजाची सुव्यवस्था तथा पोलीसांची कार्य सफलता ही जनता व पोलीस यांच्यातील सामंजस्य व विश्वासाशिवाय संभव नाही. जो पर्यंत जनतेचा पोलीसांवर पूर्णपणे विश्वास बसणार नाही, तोपर्यंत पोलीसांना त्यांच्या कामात यश प्राप्त होणार नाही.

आज सुध्दा समाजात पोलीसांची गाडी एखाद्याकडे गेली की, लोकांमध्ये भितीचं वातावरण तयार होतं. शेजारी पाजारी आपआपसात काहीबाही कुजबुजू लागतात. आजही पोलीसांकडे पाहतांना जनतेच्या मनात भीती असते आणि जनतेकडून पोलीसांना मदत तर दूरच परंतु लोक त्यांच्या जवळ जाण्यासही टाळाटाळ करतात. हा अविश्वास आजही समाजातील कमजोर वर्ग, महिला, मुले इत्यादीसाठी घातक सिध्द होत आहे. त्यामुळेच त्यांच्यावर झालेल्या अन्यायाविरुध्द पोलीसांकडे ते तक्रार सुध्दा करत नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाला ते अधिक चालणा देण्यास कारणीभूत होतात. आजही वरील वर्गावर होणाऱ्या अन्यायापैकी दोन-तृतीयांश अपराधांची नोंद होत नाही. ज्या अपराधाची पोलीस स्टेशनला नोंद केली जाते, त्या अपराधासंदर्भात पोलीसांना समाजाकडुन पूर्णपणे सहाय्य केले जात नाही. त्यामुळे तपासाच्या कार्यात अडथळा निर्माण होतो. तसेच कित्येक वेळा अपराध्यांच्या विरुध्द आवश्यक असलेले पुरावेही मिळत नाहीत. ही अविश्वासाची दरी कमी झाली नाही तर पोलीस समाजाचे भले करु शकणार नाहीत. तसेच समाजसुध्दा स्वत:चे भले करु शकणार नाही. यावेळी आवश्यकता आहे ती एकमेकांवर पूर्णपणे विश्वास ठेवण्याची.


हल्ली इनस्टंट जस्टीस एक नवीन मानसिकता तयार झाली आहे. खास करुन तरुण वर्गाला समाजात झालेल्या अन्यायाला तात्काळ न्याय हवा आहे. जसे की, एखाद्या अपघातामध्ये एखादी व्यक्ती मरण पावली असेल, तेव्हा हिंसक जमाव वाहन चालकाला मारुण-मारुण अर्ध मेला करुन सोडतात. प्रसंगी त्याची गाडी जाळून टाकतात. एक गोष्ट सगळ्यांनी लक्षात ठेवायला पाहिजे की, एक चूक ही दुसऱ्या चुकीला न्याय देऊ शकत नाही. अशा प्रकारच्या घटनासंबंधी पोलीसांकडून जेव्हा शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी बळाचा वापर केला जातो तेव्हा त्यांच्या विरुध्द धरणे आंदोलन अथवा घोषणा दिल्या जातात. कोणत्याही परिस्थितीत कायदेशीर सुव्यवस्था प्रस्थापित करणे हे पोलीसांचे आद्य कर्तव्य आहे. काही समाज कंटक शांततेचे वातावरण भंग करण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा समाजातील व्यक्तींनी अशा समाज कंटकांना मिळून शांततेचा भंग करण्यापेक्षा, त्या समाज कंटकाविरुध्द पोलीसांना सहाय्य केले पाहिजे. आज समाजात असा समज आहे की, पोलीस व कोर्ट कचेरी यांच्या पासून जेवढे दूर राहता येईल, तेवढे त्यांच्या फायद्याचे आहे. अशा परिस्थितीत कित्येक वेळा पीडित त्यांच्या विरुध्द झालेल्या अत्याचारा संबंधित अपराधाची नोंद करत नाहीत. तसेच सर्वसामान्यपणे कोणीही त्याच्या मदतीसाठी पुढे येत नाहीत. अशा परिस्थितीत पोलीस त्यांचे कर्तव्य चांगल्या प्रकारे बजाऊ शकत नाहीत. याउलट कित्येक वेळा जो अपराधी आहे, तो सर्व प्रथम तक्रार दाखल करण्यासाठी पोलीस स्टेशनला पोहोचतो. शेवटी एक गोष्ट महत्त्वाची आहे की, समाजातील जागरुक नागरीकांनी फक्त पोलीसांच्या मदतीसाठी पुढे येणे एवढेच अपेक्षित नसून त्यांनी समाजातील सर्व व्यक्तींना त्यांच्यावर झालेल्या अन्यायाविरुध्द आवाज उठविण्यास प्रोत्साहित केले पाहिजे. यामध्ये तरुणांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. अनुसूचित जाती तथा अनुसूचित जमातीच्या लोकांविरुध्द करण्यात येणाऱ्या अपराधांसंदर्भात समाज व समाजसेवी संस्था यांनी सुध्दा पुढाकार घेऊन झालेल्या अन्याया विरुध्द पोलीस स्टेशनला त्यासंबंधी नोंद करणे आवश्यक आहे.

गोष्टीसाठी कॉल करत नको जाऊ. दिवाळी असली तरी काय झालं माझी थोडी सुट्टी आहे. समोरून आवाज आला तुमच्या आई हॉस्पीटल मध्ये भरती करण्यात आले आहे. वेळ मिळला तर या. रोहणच्या डोळ्यात अश्रु आले. त्याला समोर काय बोलाव क नव्हत तो म्हणला मी सरांना विचारून येतो तु तो पर्यंत...पुर्ण बोलणे होण्या अगोदरच एक वेटींग वर कॉल होता रोहनने कॉल घेतला समोरुन एक पत्रकार बोलत होता. सर मुख्य बाजारपेठेत एक दुकानाला आग लागली आहे. रोहन लगेच कर्मचाऱ् घेवुन बाजार पेठेत गेला. घटनास्थळाचे बारकाईने निरीक्षण व परिक्षण केल. सिसिटिव्ही फुटेज पाहील. आजु बाजुच्या लोक विचारपुस केली. ज्या दोन लोकांनी आग लावली त्यांना शोधु काढुन त्यांना पकडुन घेवुन आला. ती दोन लोक मालकाचे नातेवा होते. त्यांच्या कडे ८०दुकान होते. समाजच्या दोन तिन लोगो निर्णय घेतला व रोहनला येऊन म्हणाले साहेब तक्रार द्यायची न रोहनला काम केल्याचे मानसिक समाधान मिळाले ते एकदम नाहीसे झाले.

पोलीस कर्मचारी रोहन ला येवुन म्हणाला सर आप सुट्टी घेवुन गावी जावा तुम्ही जेवण करुन घ्या रात्रभरापासुन तु उपाशी आहात रोहन ने मान हलविली व आपल्या सरांना फोन लावला सरांनी फोन उचलला नाही. रोहनला वाटले की सर कुठे व्यस्त असतील म्हणून तो ऑफीसला गेला. तेथे समजले की, सर दुसऱ्या तालुक्यात कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्ताला आहेत. तेव्हा त्याला वायरलेस मिळाला की, त्याच्या पोलीस स्टेशनच्या स्टाफसह तो तालुक्याला बंदोबस्ता क तात्काळ हजर होईल. रोहन लगेच निघाला जातांना त्याने घरी मॅसेज केला हॉस्पीटला पोहचले का आई व आहे आता. रोहन ने किती वाजले ते पाहीले तर ११.०० वा. होते. आता हॉस्पीटल सगळेच पोहचले अस असे त्याला वाटले त्याने फोन लावला तर फोन कोणी घेत नव्हेत काय करावे काय नाही त्याला स नव्हते तो घाबरलेला होता.

त्याची गाडी थांबली त्याने पाहीले की सर्वजण रोडवर जमलेले होते व दगड मरत होते. लोकांचे मोठे भांडण झाले ह रोहन त्याच्या कर्मचाऱ्यांसोबत खाली उतरला. भांडण सोडवित असतांना कर्मचारी सुध्दा जखमी झाले होते. रोहन हा पक्ष लिडरला समजुन सांगत होता. लोक समजुन घेण्याच्या मनस्थितीच नव्हते. तेवढ्यातच एक दगड रोहन च्या डोक्यावर लाग

रोहन झोपतुन उठला व एकदम कावराबावरा पाहत होता. तो रुम मध्ये होता. त्याने घड्याळात पाहीले सकाळचे ०९ वाजले होते. त्याचे मित्र त्याला बोलविण्यासाठी त्याच्या घराच्या हॉलमध्ये आले होते. रोहनला जाग आल्यावर समजले की, हे स्वप्न होते. त्याला कळुन चुकले की, पोलीस म्हणून काम करणे एवढं सोप नसतं. वर्दी ही दिखाव्या साठी नाही. ती खुप व जबाबदारी आहे. वर्दी म्हणजे आपल्या दुख पेक्षा दुसऱ्याच दुःख जाणून घेणे, दुसऱ्याची सुरक्षा करणे, लोकांच्या काम प्राथमिकता देणे पोलीसांचे जिवन २४ तास धोक्यामध्ये असते. हिवाळा, पावसाळा आणि उन्हाळ्या या तिन्ही ऋतु पोलीस नेहमी आपले कर्तव्य पार पाडत असतात. आपल्या जिवाची, परिवाराची पर्वा न करता पोलीस गुन्हेगारांना न्यायाल हजर करतात व समाजाचे संरक्षण करतात. रोहन लगेच त्याच्या मित्रा जवळ गेला व म्हणाला की, चला आपण आपली सुधारु. आज काही तास आपण ट्राफीक पोलीस यांच्या सोबत काम करु व आपल्या मित्रांना नातेवाईकांना समजावुन सां कायदा पाळणे हे आपले कर्तव्य आहे. कायद्याचे पालन केल्याने आपली सुरक्षा व आपला आदर केला जातो. पोलीसांची मदत व आपण आपल्या लोकांची मदत करतो . पोलीस आपल्याच सुरक्षेसाठी आहेत. आपण त्यांच्यावर आरोप केल्यापेक्षा त्यांच भरोसा करु त्यांची मदत घेण्यासाठी व देण्यासाठी मनात भिती न पाळगता त्यांच्या सोबत उभे राहु. रोहनच्या मित्राने सगळ्या ऐकल्यानंतर व दोघेही हेल्मेट आणण्यासाठी गेले तेव्हा तिसरा मित्र म्हणाला मी आणि रोहन आम्ही दोघच मोटरसायकलवर तिसऱ्याने त्यांना होकार दिला.



आई वडीलांचे योगदान जीवनात सगळ्यात महत्वाचे आहे. त्यानंतर गुरुचे स्थान आहे. तर पोलीस ही तुमच्या आई वडीलानंतर तुमच्या सुरक्षेची जबाबदारी स्विकारतो त्यांना सुध्दा त्यांचा मान व हक्क आपल्याकडुन दिला गेला पाहीजे. आमचे बोध वाक्य गुन्हेगारांना भय व जनतेत विश्वास.

**प्रियंका मिना** (भा.पो.से.)

सहाय्यक पोलीस अधिक्षक,वाशिम



# दारुची नशा करी जीवनाचा घात

जळगाव जिल्ह्यातील भुसावळ ता. पोलीस स्टेशनला कार्यरत असतांना रात्री ०२.३० ते ०३.०० वा. चे सुमारास ठाणे अंमलदार शेख यांचा फोन आला. " साहेब, साके गाव येथील धाब्यावर डबल मर्डर झाला आहे." असे घाबरत घाबरत ते सांगत होते. अशी माहिती मिळताच स्टाफसह मी घटनास्थळी दाखल झालो. साकेगाव येथील मामाच्या ढाब्याबाहेर रेतीच्या ढिगाऱ्यावर दोन तरुन मुलांची प्रेत पडलेली होती. ते बघून माझे मन सुन्न झाले. घटनास्थळाची माहिती घेता, जळगाव येथून आपल्या मित्राच्या वाढदिवसाची पार्टी करण्यासाठी चार ते पाच मुले ढाबे शोधत शोधत भुसावळ साकेगाव येथे ०१.३०ते ०२.००वा. दरम्यान रिक्षाने आले. येतांना.. त्यांना जळगाव ते भुसावळ दरम्यान बीयर प्याले. हॉटेल, धाबे बंद झाल्याने जेवनाकरीता ते साकेगाव येथे आले. ढाब्याच्या आजूबाजूला असलेल्या मोकळ्या शेतशिवारात मुस्लीम महिला व इतर महिलांकडून वेश्या व्यवसाय करत असे, त्या महिलांना ने-आण करण्याचे काम सलीम रिक्षावाला नियमितपणे करत असे. दारुच्या नशेत त्या मुलापैकी एकाने त्या शरीर विक्री करणाऱ्या महिलेला विचारले असता. सलीम रिक्षावाला म्हणाला, "वो मेरा डाव है; उसके पास मत जा." या वरुन त्यांची बोलाचाली झाली. त्या मुलांनी रिक्षावाला सलीम यास मारहान केली. रिक्षावाला रिक्षा घेऊन निघून गेला. तो परत त्याचा मित्र 'संजय' यांचेसह आला. तो पर्यंत ही मुले खाटेवर जेवणाला बसलेली होती. सलीम व त्यांचा मित्र संजय यांनी चाकू, सुऱ्यांनी त्या बसलेल्या मुलांवर सपासप वार केले. दोन गंभीर जखमी झाल्याने जागेवर मरण पावले. सदर गुन्हयाचा तपास बारकाईने करुन आरोपी विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र सादर केले. सदर गुन्ह्यात दोन्ही आरोपींना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. आरोपींना जन्मठेपेची शिक्षा झाल्याने आनंद झाला आहे. परंतु दोन तरुण मुलांचा मुत्यू झाल्याने तेवढे दुःख झाले.



**किरण ह.धात्रक**

पोलीस उप-अधिक्षक, (गृह) वाशिम



# माता न तु वैरीणी

सकाळचे आठ वाजले असतील ड्युटीचा वेळ साधन्याच्या दृष्टीने मी आपले एक-एक काम घड्याळाकडे पाहत पार पाडत होतो. तेवढ्यात फोनची बेल वाजली. वाटलचं पोलीस स्टेशन मधील असेल "हॅलो सर नमस्कार पोलीस उपनिरीक्षक संग्राम सिंग बोल रहा हु... एक अकस्मात मृत्यू हुई है." माहिती घेतल्यावर पुन्हा पोलीस स्टेशनला जाण्याची तयारी करुन गाडीने निघालो पोलीस स्टेशनला जाऊन बसलो, तोच पुन्हा फोन "सर मै संग्राम सिंग बोल रहा हुँ. सर मै अकस्मात मृत्यू के लिये डिफेंन्स हॉस्पीटल पहुचा, यहाँ जो लडका expire हुआ है, उसे उसके माँ और भाईने लाया मै इन्व्हेस्ट कर रहा था इतनेंमें जो उसका बडा भाई था वह गिर पडा है। डॉक्टर लोग ईलाज कर रहे है" एवढे ऐकताच डोक्यात विचित्र प्रकारचे असल्याची घातपात असल्याची पाल चुकचुकली ते ऐकून मी पोलीस उपनिरीक्षकला म्हटले कि "ठिक है मै पहुंच रहा हु" त्वरीत माझ्या रायटर व स्टाफसह मी वाडीतील डिफेंन्स हॉस्पीटलला पोहचलो तेथे वस्तीतील लोकांची गर्दी जमलेली होती. मी दुसऱ्या मुलांकडे पोहचेपर्यंत त्याचीही ज्योत मालवली, मुलांची आई कोठे आहे म्हणून मी तिच्याकडे गेलो. तर "कसे झाले हो साहेब!" म्हणुन रडत होती मी तीला शांत व्हा कसे घडले काय झाले त्यावर ती रडतच म्हणाली की, चहाने घात केला रात्रीच्या गंजात फक्त चहा दिला होता हो ती पुन्हा बेशुध्द झाली होती, नातलग वैतागलेल्या नजरेने व काही प्रश्नार्थक नजरेने रोखुन पाहत होते, काही तर म्हणत त्या बाईचे दोन तरुन पोरे गेली त्यांना काय माणूसकी हाय की नाय ? मी तसाच डॉक्टरांना भेटलो व विचारले डॉक्टर साहेब ही फुड पॉयझनींग नाही वाटत त्यावर डॉक्टर स्पष्ट बोलायला तयार नव्हते गर्दी वाढत होती मी त्यांनी काढलेले सॅम्पल सील करुन, दोन्ही मुलांचे इन्क्वेस्ट पंचनामे करवुन डेड बॉडी मोडीकलला पाठविण्याची तयारी करावला सांगुन पुन्हा मुलांचे आईला काहीतरी माहित असेल या विचाराने पुन्हा त्यांच्याकडे गेलो व नातलगांना दूर करुन मला थोड विचारणा करु द्या म्हणुन मुलांच्या आईला कसे काय झाले? सकाळ पासूनची दिनचर्या विचारु लागलो, मुलांच्या आईने सांगितले की, मी त्यांना फक्त चहा दिला व दोघेही रनींगला गेले. परत आल्यावर लहान मुलगा म्हणू लागला आई कसे तरी वाटते चक्कर येत आहे. त्यामुळे मी माझ्या मोठ्या मुलासह ऑटोमध्ये लहान मुलाला घेऊन डिफेंन्स हॉस्पिटलला आले, एका मागून एक असे दोघेही मला सोडुन गेले हो साहेब असे म्हणुन ती पुन्हा बेशुध्द झाली. बाईचे नातलग पुन्हा आले, आरडा ओरडा सुरु झाला पुन्हा काही प्रश्नार्थक तर काही तुम्हाला माणुसकी आहे की नाही अशा नजरेने माझ्याकडे व माझ्या स्टाफकडे पाहत होते. एकाच वेळी एक १२ वर्षाचा व एक १४ वषाच्या मुलाचा मृत्यू झाला होता. सर्व वातावरण शोकाकूल झाले होते. शेजारी वस्तीवाले प्रश्नार्थक नजरेने पोलीसाकडे पाहत होते.

सदर घटनेसंबंधी कोणीही शंका काढायला तयार नव्हते. माझे मन मात्र मला हा घातपातच आहे असे ठणकावत होते. मी घटनेची गंभीरता पाहून माझे ACP गवई साहेबांना माहिती दिली होती. त्यांमुळे ते सुध्दा आले होते. मी मुलांचे आईला त्यांच्या घरी घेऊन जा व त्यांना लिंबु पाणी द्या त्यांना बरे वाटेल असे त्यांच्या नातेवाईकांना सांगितले. त्या पूर्वी मी माझ्या काही कर्मचाऱ्यांना त्याचे घरी पाठवून घरची फोटोग्राफी करायला सांगितले होते. त्यामुळे तेथील आजू- बाजूचे लोक काही एक बोलत नव्हते. मी घरच्या आजू-बाजूला मात्र विषारी औषध घरी किंवा बाहेर कोठे तरी सापडेल या उद्देशाने कामाला लागलो होतो. माझ्या मनात सदर घटना फूडपॉयझनिंगची नाही याची खात्री झाली होती. सर्व डिफेंन्स वस्ती तरुण मुलांच्या मृत्यु ने हळहळत होती. मी मुलांची आई आल्यावर पुन्हा त्यांना तुमचे घरी विषारी औषधी होती काय?



असा प्रश्न वारंवार विचारत होतो. नेमके हाच प्रश्न विचारल्या नंतर मात्र ती बेशुध्द होत होती. एकदमच ती जाग आल्या सारखी माझ्यावर ओरडली. साहेब तुम्ही माझ्यावरच संशय तर घेत नाही ना? मीच या मुलांना १४ वर्षा पासून याच छातीला लावुन दूध पाजून मोठे केले याचा बाप तर १२ वर्षा पूर्वीच मेला होता हो, मी त्यांना मोठे केले त्याच मुलांना मी काही करु शकते काय असे प्रश्नार्थक नजरेने ती सांगत होती. मी मात्र जोराने ओरडत विचारले असता क्षणभर माझेही काळीज हेलावले. पोलीस अखेर माणूसच असतो मी स्वत:ला सावरले. पुन्हा प्रश्न केला. तसे नाही बाई मला म्हनायचे असे आहे की, तुमचे घरात विष वगैरे होते काय? तुम्हाला न सांगून या मुलांनी तुमचे अपरोक्ष काही घेतले तर नाही ना? त्या वर ती थोडी शांत झाली मात्र तिचे नातलग सोयरे माझे कडे वक्र व असंतुष्ट, प्रश्नार्थक नजरेने पाहत होते तेवढ्यात मागे माझे ACP गवई साहेब आले, हळूच बोलले चव्हाण हे बरोबर नाही असे काही बोलु नकोस स्थिती बिघडेल, मी मात्र माझ्या सिक्सर्सेसचे ऐकत होतो. मी साहेबांना नम्रपणे बोललो सर मी पाहुन घेतो मला मात्र विचारुच द्या. गर्दीत बाईचे नातलग व वस्तीतील लोकांची गर्दी वाढतच होती.

तेवढ्यात देवदूता प्रमाणे माझा एक कर्मचारी आला व म्हणाला साहेब एक १२ वर्षाचा मुलगा आहे वस्तीतीलच आहे तुम्हाला काही तरी सांगायचे म्हणतो म्हणून मी बाईला शांत व्हा, मी पुन्हा येतो मला एकदा माझ्या प्रश्नाचे उत्तर द्या असे म्हणून कर्मचारीच्यामागे गेलो. तर एक १२-१३ वर्षाचा मुलगा माझ्या समोर होता. परंतु तो भयभीत होता एका बाजूने कर्मचारी व दुसरीकडे लोकांची गर्दी पाहुन, त्या मुलाचा बाप माझ्याकडे आला व म्हणाला की, मेरे बच्चे को कुछ नही होगा तो बतायेंगे. अशी विनवणी करु लागला, मी त्याचे सांत्वन केले. त्यास सांगितले अच्छि बात है. तुम क्युँ डरते हो बच्चे को बोलने दिजीये त्यावर त्या मुलाने मेरा नाम आकाश है मै छोटे के साथ जाता था मगर आज पता चला की, वह मर गया तो मुझे १ हप्ते पहिले उसके मम्मी ने कहा था की, मेरे घरके निंब के पेड को रोग लगा है, वह सड रहा है, बेटे मुझे मेडीकलसे पॉयझन चाहिये इसके लिये उन्होने मुझे पैसे देकर मेडिकल भेजा था। मै मेडीकल मे गया वहा मडिकल वाले को पॉयझन चाहिये बोलने पर उसने तुम बच्चे हो और हम छोटे बच्चेको पॉयझनकी दवाई नही देते ऐसे कहा। इस लिए मै वापस आकर चाची को बाताया था। असे त्याचे बोलणे ऐकूण माझे सिक्स्थ सेन्सने दाखविलेल्या दिशा योग्यच असल्याचे वाटले. त्या मुलाचे नाव व गाव लिहुन घेवून त्यांचे वडिलांना भिऊ नका तुमचा मुलगा हुशार आहे असे म्हणून परत जायला सांगितले. आता मात्र माझ्या मनात विश्वास निर्माण झाला की, मुलांचा मृत्यु विषामुळेच झाला असावा. परंतु त्यांनी ते विष घेतले की, त्यांना कोणीतरी ते पाजले ? हा महत्त्वाचा प्रश्न होता.

एखाद्या आईला तुम्ही मुलांना विष दिले असे म्हणायला मोठे धाडस लागते मुलांच्या आईचे वातावरण शोकाकूल होते. आमचे हातात मात्र त्या मुलाचा तेवढ्यातच एक पुरावा होता. मुलाचे घराचे आजू-बाजूला कोठे तरी विषारी औषध मिळणे फार गरजेचे होते. बराच शोधाशोध घेतल्यावर खोकल्याच्या औषधाची बॉटल मिळाली. माझा कर्मचारी याने ती आणली. खुर्चीवर सापडली म्हणे मी बॉटलचा वास घेवुन पाहिले असता तो वास विषारी औषध किंवा किटकनाशकासारखा आला या वरुन माझी खात्री झाली की, दोन्ही मुलांना फुडपॉयझनिंग झाले नसून विष प्रयोग झालेला आहे, येवढ्या गर्दी मधून बाईला घेऊन जाणे कसे शक्य आहे ? तिला तिच्याकडे सखोल विचारपुस करणे गरजेचे होते. तीने घरी विष आणले होते काय? किंवा मुले रनिंगला गेले त्यांनी तिकडे काही खाल्ले तर नाही ना ? असे अनेक प्रश्न डोक्यात गर्दी करीत होते. तो पर्यंत घरातील मोरी मधील चहाचे भांडी कुंडी तील पाणी, मोरीचे पाणी तपासणी करीता, सिल करुन सी.ए.कडे पाठविणे करीता ताब्यात घेतले. पुन्हा एकदा प्रश्नांचा कल पध्दत बदलवित मुलांच्या आईला दुसऱ्या रुम मध्ये नातलग बाई सोबत बोलाविले तिला विश्वासात घेऊन तिला विचारले कि तुम्ही फक्त घरात विष होते काय ते सांगा खरे बोला, खूप वेळाने मुलांची आई ने कबूल केले की, मी झाडाला कीड लागली म्हणुन विष आनले होते. पण मी मुलांना ते दिले नाही. बस.... माझ्या प्रयत्नांना यश आले होते तो पर्यंत बाहेरील लोकांच्या डोक्यात सुध्दा मुलांच्या

मरणाबाबत आता मात्र संशय चालू झाला होता. दोन्ही मुलांच्या डेड बॉडी मेडीकलला रवाना केल्या त्यावेळी महिलांच्या डोळयात अश्रू तरळले होते. असे कसे झाले अशा विचारांनी पोलीसांकडे त्यांच्या नजरा भिरभिरत होत्या. मला मात्र मी काहीतरी जिंकले असा विश्वास वाटला होता. परंतु तोंडातुन शब्द काढणे जोखमीचे होते. काही समाज पुढारी मला म्हणत होते की साहेब ये कैसे क्या हुआ इसका पत लगानाही पडेगा तेव्हा त्यांना देखतेहै कोशीश चालू है असे सांगून वेळ निभावित होतो. मुलांची डेड बॉडी गेल्यावर थोडया वेळाने मी मुलांच्या आईला गाडीत बसविले. तेव्हा मात्र तिचे नातलग एकदम ओरडले व म्हणाले कुठे नेता हिला ? तेव्हा मात्र मला त्यांना कडक शब्दात समज देणे भाग पडले. लोकांची गर्दी होती तरी सुध्दा जोखीम घेणे भाग होते. गर्दी गाडीकडे बघू लागली तेव्हा इनसे बहुतसारी जानकारी चाहिये, इस लिये मुझे इन्हे अभी लेके जाना जरुरी है आप लोग सहयोग करे। दो जान गई है, नजरेतच पुढारी मंडळी व लोक काय ते समजल.देव जाणो १० ते १२ हजाराचे गर्दीत एकदम टाळया वाजवीणे सुरु केले. मी त्वरीत मुलांच्या आईला घेऊन पोलीस स्टेशनला पोहोचलो.

पुन्हा मुलांचे आईस बोललो, बघा बाई आतातरी खरे सांगा थोडा तरी पश्चाताप होतो का? आता मात्र बेशुध्द होवुन नका.सरळ सांगा. तेव्हा मुलांचे काका पोलीस स्टेशनला हजर आले. त्यांनी मुलांचा घातपात झाला आहे. त्यांच्या आईनेच केला आहे अशी फिर्याद दिली. अखेर बाईला सांगावेसे वाटले की तुम्ही आईला बदनाम केले खरं सांगा तुम्ही काय केले? ते फुडपॉयझनींग नव्हते. बराच वेळ आढे-वेढे घेत बाई माझ्या पायावर पडली. हो तिला बाईचं संबोधने योग्य होईल. मी आई कशी म्हणु? पायावर पडून हुंदका फोडुन रडु लागली. मीच माझे मुलांना सकाळी चहामध्ये घरी आणलेले विष मिक्स करुन दिले. बस... डोक्यामधुन एकदम प्रेशर हटल्या सारखेवाटले मी तीला उठवून तिचे चेहऱ्याकडे पाहत राहिलो. मनात विचार केला हिच त्या दोन तरुन मुलांची आई आहे हे कसे शक्य झाले ? असेन ज्या मुलांना जन्म दिल्यावर एवढे मोठे केल्यावर त्या निष्पाप मुलांना किती क्रूरपणे विष दिले ही माता कि वैरीण।

मुलांच्या आईने कबूली दिल्यामुळे मी तीला कायदेशीर रित्या अटक केली त्या मुलांना विष देण्याचे खरे कारण तिचे कडुन वदविले तेव्हा तिने सांगितले की, माझे मालक १२ वर्षा पूर्वी मरण पावले एकटी नोकरी करत मुलांना सांभाळले मोठे केले, त्यांना आता सर्व समजत होते.माझे प्रेम एका ऑटो ड्रायव्हर वर होते मुलांमुळे अडचण होत होती. मला माझे जीवन माझे मनाप्रमाणे जगण्याची इच्छा होती. मुलांमुळे माझी इच्छा पूर्ण होऊ शकत नव्हती म्हणून मी हे कार्य केले. असे तिचे वाक्य ऐकून मी एक क्षण स्तब्ध झालो. एक आई म्हणजे जीने शिवाजी, राम व कृष्णा सारखे मुले घडविले, त्या आईच्या नात्याला का कलंक आहे असे माझ्या मनात आले. सदर डबल मर्डरची केस असल्याने गंभीरतेने पुराव्याचे दृष्टीने तपास करण्यात आला, पुराव्याची सुंदर साखळी गुंफण्यात आली. सर्व प्रसार माध्यमांनी सदर बातमी प्रत्येक वर्तमानपत्रात व इलेक्ट्रानिक मिडीयाचे चॅनल वर प्रसिध्दी दिली.

सदर केस सेशन कोर्टात चालली व माझ्या प्रामाणिक प्रयत्नांना यश मिळाले. सदर खटल्यात मुलांचे आईला जन्मठेपेची शिक्षा मा.वि.न्यायालय नागपूर यांनी ठोठावली. त्यावेळी खऱ्या अर्थाने मी घेतलेल्या परिश्रम कामी आले त्याचे फलित झाले, एक क्रूर बाई जिन आईचे पवित्र नाते मलीन केले त्याला काळीमा लावली अशा क्रूर महिलेला शिक्षा झाल्याने समाधान वाटले. त्यावेळी वाडी परिसरातील जन पुढारी समाजसेवकांनी फोनद्वारे अभिनंदन केले.



**डी.जे. चव्हाण**
पोलीस उपअधिक्षक,
आर्थिक गुन्हे शाखा, वाशिम



## पोलीस : प्रतिमा आणि वास्तव

'पोलीसांची प्रतिमा' हा नेहमीच पोलीस दलात, समाजात, प्रसारमाध्यमात चर्चेला गेलेला विषय पोलीसांची प्रतिमा सकारात्मक व नकारात्मक दोन्ही प्रकारची असते. प्रत्येक व्यक्तीला प्रत्यक्ष पोलीसांचे आलेले अनुभव, ऐकिव अनुभव, समाजमाध्यमातील माहिती, माध्यमांमधील बातम्या, यावरुन प्रत्येकजण पोलीसांविषयी आपली मते/भूमिका ठरवितो व त्यातून समाजाची पोलीसांविषयी प्रतिमा बनते. यावर सामान्य माणसापासून ते त्या-त्या क्षेत्रातले तज्ञ यांनी बऱ्याच भूमिका व मतं मांडली आहेत, मांडली जातात, मांडली जातील. पोलीस हा देखील समाजाचा घटक असतो, समाजात ज्याप्रमाणे बरेवाईट दोन्ही प्रकारचे लोक असतात. त्याप्रमाणे पोलीसातही असतात. कारण मुळात मानवी प्रवृत्तीत गुण-दोष असतात. पोलीसांच्या प्रतिमेबद्दल चर्चा का होण्याचे कारण असे की, पोलीस हा कायद्याचा रक्षक आहे, कायदयाच्या अंमलबजावणीची जबाबदारी त्याचेवर आहे, त्यामुळे त्याने कायद्याच्या अंमलबजावणीत केलेल्या चुका यामुळे समाजावर विपरित परिणाम होतात, म्हणून चर्चा होत असते. पोलीसांच्या भुमिकेचे माध्यमांनी व समाजाने समीक्षण करण्यात गैर काहीच नाही. कारण ती सार्वजनिक सेवा आहे. प्रत्येक सार्वजनिक सेवक हा जनतेला उत्तरदायी असतोच फक्त पोलीसांची प्रत्येक कृती चुकीची, बेजबाबदारपणाची असा गैरसमज, साशंकता नसावी. व पोलीसांवरील जबाबदाऱ्या, कामाचा व्याप, त्यांचे अधिकार, मर्यादा, त्यांनी केलेले प्रयत्न या सर्वाचा सर्वार्थाने विचार व्हावा.

पोलीसांची कामे कोणती तर थोडक्यात १) जनतेच्या जीवित व मालमत्तेचे रक्षण करणे २) गुन्हे प्रतिबंधक ३)गुन्हे डिटेक्शन ४) गुन्हे तपास ५) कायदा व सुव्यवस्था राखणे ही प्रमुख कार्ये, म्हणजे गुन्हे घडू नये म्हणून गस्त रात्रगस्त करणे, गुन्हेगारी इसमांवर प्रतिबंधात्मक कारवाया करणे,गुन्हे घडल्यानंतर ते उघडकिस आणणे, व त्यानंतर गुन्हा उघडकीस आल्यानंतर, आरोपीला अटक करणे,आवश्यक तो पुरावा गोळा करुन तपासाअंती त्याचा अंतिम अहवाल कोर्टात सादर करणे.यातील कायदा व सुव्यवस्था राखणे या शब्दाची व्याख्या फार व्यापक आहे. कायदा व सुव्यवस्था या शब्दाचा अर्थच असा की, कायद्याचे अंमलबंजावणीतून सुव्यवस्था राखणे. सुव्यवस्था (order)- व्यावहारिक भाषेत असे म्हणता येईल की,सुरळीतपणा-दैनंदिन सामाजिक,आर्थिक,राजकिय घटना-घडामोडी या सुरळीत चालणे,सामान्य नागरी जीवन सुव्यवस्थित चालणे, म्हणजे थोडक्यात प्रत्येक नागरिकाला त्याचे वैयक्तिक व सार्वजनिक आयुष्य सुव्यवस्थित सुरळीत जगता यावे, अशी परिस्थिती मग यामध्ये कोणतेही आंदोलन, मोर्चा,जातीय तणाव,बंद,संप,उपोषण,दंगली व हिंसक घटना इत्यादी घटकांनी नागरी जीवनात अडथळा वा अव्यवस्था निर्माण होणार नाही, ही जबाबदारी पोलीसांची असते. याचा नीट विचार केल्यास कायदा व सुव्यवस्था राखणे याची व्याप्ती समजुन येते. स्थानिक मोर्चे आंदोलनापासून ते परदेशातील आंदोलनांचे,घटनाचे इथल्या समाजावर होणारे परिणाम,त्यातून उमटणाऱ्या प्रतिक्रिया या सर्व बाबीची पोलीसांना दखल घ्यावी लागते. त्याबाबत सतर्क राहावे लागते. त्यामुळे समाजात कोणताही गुन्हा,दुर्घटना व दैनंदिन सामाजिक जीवन विचलित करणारी परिस्थिती उद्भवू नये यासाठी पोलीस कार्यरत असतात.

ही कर्तव्ये व जबाबदारी निभावताना काही वेळा पोलीसांच्याकडून नकळत कधी निष्काळजीपणे, कधी जाणूनबूजनही चुका होतात, (चुकांना पोलीस नियमाप्रमाणे शिक्षाही होतात) चुकांमुळे समाजात पोलीसाविषयी

नकारात्मकता तयार होते, तसे होणे स्वाभाविक आहे. परंतु बऱ्याच वेळा प्राप्त परिस्थितीत पोलीसांनी उत्तम, त्यांचे पूर्ण कार्यक्षमतेने काम करुनही परिस्थिती हाताबाहेर जाते, बऱ्याचदा अपेक्षित यश मिळत नाही तेव्हादेखील समाजाचे रोषाला सामोरे जावे लागते. यात चूक कोण व बरोबर कोण? हे शोधण्यापेक्षा पोलीसांची भूमिका, त्यांच्या मर्यादा, अधिकार याविषयी सर्व सामान्य नागरीकांपर्यंत नीट माहिती न पोहचणे, त्यांना त्यांचे स्पष्ट आकलन न होणे, कायद्याविषयी अज्ञान यामुळेच गैरसमज निर्माण होतात. उदा.एखादा गुन्हा घडल्यानंतर सुरूवातीच्या काही तासात आरोपी मिळाले, तर ठिक अन्यथा सध्याचे प्रगत दळणवळणाची साधने व वेगवान युगात आरोपी मिळणे कठीण जाते. बऱ्याच वेळा पोलीसांनी प्रयत्न करुनही आरोपी मिळत नाहीत. काही वेळा गुन्हा दाखल होण्याआधीच आरोपी फरार झालेले असतात. अशावेळी समाजातील सुजाण,दक्ष नागरिकांनी पोलीसांपर्यंत गोपनीय माहिती पोहचवल्यास मदत होवू शकते. परंतु आपल्यामागे भानगड नको, या गैरसमजातून सामान्य व्यक्ती सहजासहजी माहिती देण्यास तयार होत नाहीत. याचा अप्रत्यक्ष फायदा आरोपीला होतो. बऱ्याचवेळा दारुचे रेडचे वेळी कुणी पंच म्हणून हजर रहायला सहसा तयार होत नाही.कधी कधी अदखलपात्र गुन्ह्यात पोलीसांनी हस्तक्षेप करुन आपल्या सांगण्याप्रमाणे कारवाई करावी ही तक्रारदाराची अपेक्षा असते. परंतु कायद्याने तसे करणे योग्य नसते. तर कधी जागेचे, शेतीच्या सीमांचे वादविवाद पोलीसांनी तात्काळ हस्तक्षेप करुन तक्रारदाराचे म्हणण्याप्रमाणे काम करावे अशी अपेक्षा असते.तसेच वैयक्तिक पैसे देण्याघेण्याचे किंवा जागेच्या मालकी हक्काचे असे दिवाणी वादाचे तक्रारी असतात. या सर्व बाबतीत बहुतांश वेळा पोलीसांनी त्यांच्या अधिकार क्षेत्रातील मुद्यावर कायदेशीर कार्यवाही केलेली असते. परंतु तक्रारदाराच्या अपेक्षे प्रमाणे काम झाले नाही म्हणून ते नाराज होतात. अशा अनेक बाबी आहेत.

पोलीस ही कायद्याची अंमलबजावणी व रक्षण करणारी यंत्रणा आहे. महाराष्ट्र पोलीसांचे बीद्र वाक्य 'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' असे आहे. सज्जनांचे रक्षण व दूर्जनांचा निग्रह. त्यामुळे कोणत्याही समाजात दोन प्रकारचे लोक असतात. जसे कायद्याचे पालन करणारे व कायदा मोडणारे त्यांनाच बोलीभाषेत चांगले व वाईट असे म्हणता येईल. कारण मानवी स्वभाव व प्रवृत्ती मुळातच दोन्ही प्रकारची असते. चांगल्या तसे वाईट,सज्जन दूर्जन,सभ्य -गुन्हेगार हे सगळीकडे असतातच यातील वाईट,दुर्जन,गुन्हेगार यांचेवर नियंत्रण ठेवण्यासाठी व त्यांना शिक्षा व्हावी म्हणून कायदे केले जातात. कारण समाज हा सज्जनांच्या योगदानातून पुढे जातो, उन्नत होत असतो.थोडक्यात सामाजिक शातंता,सुव्यवस्था यांना बाधा आणणारे गुन्हेगारी प्रवृतीवर अंकुश ठेवणे, त्यांचा बंदोबस्त करणे हे पोलीसांचे काम नागरिकांना त्याचे दैनदिन आयुष्य शांत व सुव्यवस्थित जगता यावे, अशी सुव्यवस्था नांदावी यासाठी आवश्यक ती दक्षता घेणे व त्यासाठी विविध कायद्याच्या अंमलबजावणीतून सामाजिक, आर्थिक विकासासाठी पूरक परिस्थिती निर्माण करणे यासाठी पोलीस कर्तव्य करतात. मग अशा वेळी सज्जन,चांगल्या व्यक्तीनी पोलीसांची साथ दिल्यास मदत व माहिती दिल्यास पोलीसांचे काम सोपे हाईल. कारण लोकसंख्या व गुन्ह्यांचा विचार केल्यास समाजातील फक्त २ ते ४ टक्के लोक गुन्हेगारी प्रवृत्तीचे असतात व उरलेल्या ९६ टक्के व्यक्ती हया चांगल्याच असतात. परंतु त्यांचे मनात पोलीसांविषयी साशंकता,संशय,अनाठायी भिती यामुळे ते पुढे येत नाहीत. याची कारणे वर सांगितल्याप्रमाणे बरेचदा पोलीसांविषयी नकारात्मक प्रतिमा ही गैरसमज,कायद्याविषयीचे अज्ञान, ऐकीव माहिती यामुळे तयार झालेली असते. मागील काही



वर्षापासून पोलीस विभागदेखील मोहल्ला कमेटी,शातंता कमेटी,पोलीस मित्र तसेच सार्वजनिक कार्यक्रम, पोलीस स्थापना दिवस इत्यादी माध्यमातून जनते पर्यंत जाण्याचा,सुसंवाद वाढविण्याचा प्रयत्न करत आहे. त्यातून निश्चित चांगले अनुभव देखील येतात, पोलीसांना मदतही होते.

एकंदरीत पोलीसांची समाजातील प्रतिमा ही कधी पोलीसांच्या चुकांमुळे तर पोलीसांचे अधिकार व जबाबदाऱ्या, मर्यादा,यांचे आकलन सुस्पष्टपणे न होण्यामुळे बऱ्याचदा नकारात्मक बनते परिणामी पोलीसांना टीकेला सामोरे जावे लागते. यामध्ये कोण बरोबर व कोण चुकला किंवा कुणाला दोष देण्याचा आणि पोलीसांच्या चुकांचे समर्थन करण्याचा हेतू नक्कीच नाही. जे पोलीस चुकतात, जाणीवपुर्वक चुका करतात, त्यांना पोलीस नियमाप्रमाणे शिक्षा या होतच असतात. फक्त बऱ्याच वेळा गैरसमज,कायद्याचे अज्ञान,ऐकीव माहिती यामुळे पोलीसांची चुकीची प्रतिमा तयार होते. अशावेळी पोलीसांची भूमिका व मत समाजापर्यंत सुस्पष्टपणे पोहचविल्यास त्यातून गैरसमज दूर होऊ शकतात , असेही बरेच अनुभव आले. म्हणून अनुभवातून जे जाणवलं ते लिहलं इतकच.

प्रत्यक्ष वास्तवापेक्षा प्रतिमा उच्च असावी अशीही अपेक्षा नाही, तसे असूही नये. प्रतिमा ही वास्तवाप्रमाणेच असावी. प्रतिमा आणि वास्तव यांचा सुवर्णमध्य साधला जावा व दोन्हीची सांगड घालणे सुकर व्हावे या उद्देशाने केलेला हा एक प्रयत्न.

जय हिंद!



**रत्नाकर नवले**
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभाग,कारंजा



# आपले पोलीस आपला अभिमान –कम्युनिटी पोलीसिंग

लोकांची,लोकांनी,लोकांसाठी चालविलेली शासन व्यवस्था म्हणजे लोकशाही होय अशी अब्राहम लिंकन
लोकशाहीची व्याख्या केलेली आहे. अगदी त्याप्रमाणे कम्युनिटी पोलीसिंग म्हणजे लोकाभिमुख पोलिसिंग, पोलीस ज
संबंधातून सुव्यवस्था राखणे हा कम्युनिटी पोलीसिंगचा मूळ उद्देश होय.

पोलीस ही एक महत्त्वाची सामाजिक संस्था असून, पोलीस दलाच्या कामामुळे विकासाला पोषक वाता
निर्माण होते. कोणत्याही प्रदेशाची कायदा व सुव्यवस्था उत्तम असते तेव्हा त्या प्रदेशात अधिकाधिक गुंतवणूक आव
होते. रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी निर्माण होतात त्यातूनच त्या प्रदेशाच्या समृध्दीस हातभार लागतो. महाराष्ट्र
समृध्दीस व चौफेर विकासाला अतिशय समर्थरित्या हातभार लावण्याचे कार्य पोलीस दल करीत आहे.

१८५१ च्या भारतीय पोलीस कायद्यानुसार गुन्ह्यांचा तपास करणे व गुन्हयांना प्रतिबंध करणे ही पोली
मुलभूत कर्तव्य आहेत. लोकांच्या सहभागातून ही कर्तव्य अधिक चांगल्या प्रकारे पार पाडता येऊ शक
विसाव्या शतकामध्ये शहरीकरण, आधुनिक दळणवळण व्यवस्था तसेच आर्थिक, सामाजिक बदलांमुळे जग
पोलीसिंग मध्ये मोठे बदल झाले. ईमरजन्सी कॉलला उत्तर देणे, गुन्ह्यांच्या तपासासाठी तंत्रज्ञानाचा वापर,
पेट्रोलींग पेक्षा मोटार गाड्यांच्या सहाय्याने पेट्रोलींग करणे इत्यादी मुळे पोलीस जनता सबंध कमी झाले. परंतु १९
८० च्या दशकामध्ये अमेरीका, इग्लंड तसेच जगभरात कम्युनिटी पोलीसिंग संकल्पनेचा पुनचः उदय झाला. सद्यस्थि
कल्याणकारी राज्यव्यवस्था,मानवाधिकारांची वाढती व्याप्ती, लोकसेवा अध्यादेशांसारखे कायदे, प्रसार माध्य
वाढते प्रमाणे ईत्यादींमुळे पोलीस कर्तव्यात लोकसहभाग वाढविणे ही काळाची गरज बनली आहे. कम्युनिटी पोलीसि
फायदे अनन्य साधारण असून ते विविध उदाहरणांतून पहाता येतील.

**केरळ जनमैत्री अभियान :-** केरळ प्रमाणेच विविध राज्यात वेगवेगळे प्रयोग राबविण्यात आले. यामध्ये प
परार्मश केंद्र, मध्य प्रदेश Friends of Police चळवळ, तामिळनाडू इत्यादींचा उल्लेख करता येईल मोहल्ला, श
समिती :- केरळ प्रमाणेच विविध राज्यात वेगवेगळे प्रयोग राबविण्यात आले. यामध्ये परिवार परार्मश केंद्र, मध्य
Friends of Police चळवळ, तामीळनाडू इत्यादीचा उल्लेख करता येईल मोहल्ला,शांतता समिती :- सन १९९२
च्या दंगलीनंतर महाराष्ट्रामध्ये मोहल्ला समितीचा प्रयोग प्रथम भिवंडी व नंतर विविध भागांमध्ये यशस्वीपणे राबवि
येत आहे. या समितीच्या प्रभावी कामांमुळे जातीय सलोखा राखणे अधिक सुलभ होते.

**ग्राम सुरक्षा दल :-** गांव पातळीवर ग्राम सुरक्षा दले तयार करण्यात येतात. पोलीस मॅन्युअल भाग ३ नि
५०८ नुसार यांचा वापर गुप्तवार्ता मिळविणे,गस्त करणे तसेच आपत्कालीन परिस्थितीत शासनाला मदत करणे इत
मध्ये होतो. ग्राम सुरक्षा दलाच्या सहभागामुळे मालमत्तेविरुध्दचे गुन्हे कमी होण्यास मदत झालेली
जनता,जंगल,जवान गडचिरोलीतील यशाची त्रिसुत्री :- मागील काही वर्षामध्ये गडचिरोलीमध्ये जे विविध नावि
उपक्रम राबविणे गेले, त्यात जनता हा एक महत्त्वपूर्ण भाग होता. कम्युनिटी पोलीसींगच्या वापराने नक्षलविरोधी
अधिक बळकट झाली. ग्राम भेटी मध्ये पोलीस अधिकारी व कर्मचारी गावांना भेटी देतात. तेथील विविध समस्यांची
घेणे,त्या समस्या सबंधित शासन विभागास कळवून समस्यांचे निराकरण केले जाते.

जनजागरण मेळावे, मोठी खेडी,गावांमध्ये लोकांच्या समस्या एका दिवसांत सोडविण्यासाठी सर्व श



विभागांचा एकत्रीत मेळावा घेवून शासन तुमच्या दारीचा प्रत्यय दिला जातो.

त्याच प्रमाणे तरुणांसाठी भरतीपूर्व प्रशिक्षण,स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आली. शाळेसाठी एक तास प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांशी संवाद साधणे, आपला महाराष्ट्र अंतर्गत तरुण विद्यार्थ्यांना महाराष्ट्र दर्शन घडविणे तसेच कबड्डी, आट्यापाट्या इ. खेळांचे आयोजन या सर्व उपक्रमामुळे पोलीस जनता सबंध सुधारले. प्रोजेक्ट गती अंतर्गत तरुण रोजगारांना ड्रायव्हींगचे प्रशिक्षण देवून त्यांना चारचाकी वाहने मिळवून देण्यास कर्ज देणे इत्यादीमुळे नक्षलवाद्यांचा जनतेमध्ये रोष निर्माण करुन त्याचा फायदा उठविणे या रणनीतीचा बिमोड झाला.

कम्युनिटी पोलीसींगमुळे गडचिरोली जिल्हयात नक्षल चळवळीस उतरती कळा लागली. नक्षल इन्कांउटर वाढले तर पोलीसांची हानी कमी झाली. नक्षल समर्पणाचे प्रमाण वाढले.

**पोलीस मित्र :-** पोलीस मित्र योजना महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात राबविली जात आहे. विविध पातळ्यांवर पोलीस मित्र समितीची स्थापना करण्यात येत असून त्यामध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी, वकील, पत्रकार, निवृत्त पोलीस अधिकारी यांचा समावेश करण्यात येत आहे. पोलीस मित्रांचा वापर नाकाबंदी, पेट्रोलींग, वाहतूक नियमन इत्यादी कामी केला जात आहे. पोलीस मित्र संकल्पनेमुळे पोलीस दलाची प्रतिमा सुधारणे, पोलीस जनता सबंध सुधारणे, पोलीस दलामध्ये कामाचे समाधान मिळणे, पारदर्शकता, विकेंद्रीकरण इ. मध्ये वाढ होईल. या सर्वांमुळे गुन्हेगारीला आळा घालणे, समाजाची प्रगती करणे सहजशक्य होईल. परंतु पोलीस मित्र उपक्रमात चारित्रवान, निस्वार्थी लोकांनाच सहभागी करुन घेणे आवश्यक वाटते.

कम्युनिटी पोलीसिंगच्या अशा विविध उपक्रमांमधून सुव्यवस्था वाढण्यास मदत होते. लोकसहभागाद्वारे महात्मा गांधी तंटामुक्त गांव मोहीम, सागरी सुरक्षा दल, महिला दक्षता समिती, महिला तक्रार निवारण केंद्रे तसेच विविध हेल्पलाईन, विविध मोबाईल ॲप ई.हे सर्व कम्युनिटी पोलीसिंगचे महत्त्वाचे भाग असून, त्यामुळे पोलीस जनता सबंध बळकट होवून पोलीस कार्य सुलभ होते.

पोलीस जनता संबंधामध्ये पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी सामान्य नागरीक, नागरीकांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्ती, संस्था (लोकप्रतिनिधी,स्वयंसेवी संस्था,प्रसारमाध्यमे) इत्यादीशी सौहार्दपूर्ण वागणूक ठेवणे महत्त्वाचे आहे. केवळ गुन्हे अन्वेषण,प्रतिबंध नव्हे तर कैदी सुधारणा तसेच पुर्नवसनसाठीही जनतेचा सहभाग महत्वपूर्ण आहे.कैद्यांसाठी घेण्यात येणारी योग शिबीरे,विपश्यना ध्यान शिबीरे तसेच टाटा ट्रस्टद्वारे कैद्यांसाठी कौशल्यविकसन योजनांचे परिणाम अतिशय उत्साहवर्धक आहेत.

गेल्या काही वर्षात पोलीस दलापुढे नवनवीन आव्हाने वाढत आहेत. नक्षलवाद,दहशतवाद, सायबर गुन्हे, वेगाने होणारे आर्थिक सामाजिक बदल तसेच प्रशासनामध्ये होत असलेले बदल उदा.सिटीजन पोर्टल, माहितीचा अधिकार, मानवाधिकारी वाढती व्यापती या सर्व पार्श्वभूमीवर कम्युनिटी पोलीसिंग हे कायमचे उत्तर आहे. त्यामुळे यापुढे प्रत्येक पोलीस अधिकारी हा जनसंपर्क अधिकारी बनला पाहिजे. फिर्यादी, साक्षीदार,आरोपी सर्वांशी संवेदनशील वागणूक ठेवणे, अर्ज विनंती, चौकशी,चारित्र पडताळणी,पारपत्र पडताळणी,अशी कामे अधिक पारदर्शकपणे तन्मयतेने करणे यामुळे कम्युनिटी पोलीसिंग हा पोलीस कार्याचा दैनंदिन भाग बनेल व परिणामतः लोकाभिमुख पोलीसिंग हे वास्तव

बनेल.


मा.पोलीस अधीक्षक मोक्षदा पाटील मॅडम यांच्या नेतृत्वाखाली कम्युनिटी पोलिसिंगच्या प्रभावी वापराने वाशिम जिल्ह्यातील सण/उत्सव निवडणूका शांततेत पार पाडणे शक्य झाले. जनतेसाठी विविध जनजागृती कार्यक्रम राबविणे, शाळा,महाविद्यालये यांच्याशी संवाद वाढविणे यावर मा.पोलीस अधीक्षक मॅडम यांचा भर असून कम्युनिटी पोलिसिंग संकल्पनेची अंमलबजावणी उत्तमपणे होण्यासाठी आपला सर्वांचा यामध्ये हिरीरीने सहभाग असणे आवश्यक आहे.



**सुधाकर यादव**
उपविभागीय पोलीस अधिकारी
मंगरुळपीर जि.वाशीम







# गुहेतील सोने

एक जुनी चीनी म्हण आहे. त्याचा मराठी अनुवाद असा की, "जर आपल्याला एखाद्या समस्येवर उत्तर शोधायचे असेल, तर आपले पूर्वज अशी समस्या कोणत्या प्रकारे सोडवायचे ते पहा." बेसिक पोलिसिंग साठी आग्रही असलेल्या वाशीम जिल्हा पोलीस अधिक्षक मा.मोक्षदा पाटील मॅडम (IPS) तपासाची खबर तशी तर जुनी पण सध्याच्या Instant च्या जमान्यात दुर्लक्षित झालेली तपासपध्दती अधिकाऱ्यांना समजावून सांगत होत्या.

घटना तशीच गंभीर घडली होती, डोणगांव येथील प्रसिध्द सराफा व्यापारी विश्वेश सराफ यांच्या केनवड येथील दुकानातील दोन कर्मचारी सोन्याच्या दागिण्यांनी भरलेली बॅग मोटार सायकल वरुन डोणगांवला घेऊन जातांना दोन अनोळखी इसमांनी मोटार सायकल अडवून हातातील बॅग चाकूचे वार करुन जबरीने हिसकावून पळून गेले होते. जखमी गणेश पांडूरंग लहाने याची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यास अकोला येथील रुग्णालयात ICU मध्ये ॲडमिट केले होते. १० लाख रुपयांचे सोने व चांदीचे दागिने लुटले गेले होते. लोकांमध्ये दहशतीचे वातावरण होते व पोलीस प्रशासन हे आव्हान कशा रितीने पेलते याकडे सर्वजण लक्ष ठेऊन होते.

जुन्या काळी एखादा खून, दरोडा यांसारखा गंभीर गुन्हा घडला की ठाणेदार त्या गावाला जाऊन कॅम्प करीत असत. स्टाफसह त्या गावात प्रत्यक्ष रहावयाचे त्या राहण्याचे घटनेची संबंधित तसेच दुर्लक्षित सर्व घटक साक्षीदार व्यवस्थित तपासले जायचे व याचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी फायदा व्हायचा. पारंपरिक या पध्दतीचा वापर करण्याचे आदेश मा. पाटील मॅडमनी तपास टिमला दिले.

पानटपरी, ढाबे, बाजारपेठ, रिक्षा स्टँड, बस स्टँड येथे साध्या गणवेशातील पोलीस व गुप्त बातमीदार फिरु लागले. आरोपीच्या वर्णनावरुन स्केच करण्यात हातखंडा असणारे राजूभाऊ पगार यांनी जखमींच्या सांगितलेल्या आरोपीच्या वर्णनावरुन ICU मध्ये बसून स्केच तयार केले. त्याच्या १००० प्रती छापून ठिकठिकाणी लावल्या गेल्या. रेकॉर्ड वरील तब्बल ३७ आरोपींना पोलीस ठाण्यास आणून तपासण्यात आले. सोशल मिडीया व टिव्ही केबल नेटवर्कच्या माध्यमातून आरोपींचे छायाचित्र करुन तुमचा एक फोन गुन्हेगारास हातकड्या घालू शकतो. असा संदेश लोकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केला. शेवटी खास बातमीदाराकडून माहिती मिळाली की सराफा दुकानामध्ये काम करणारा नोकर उमेश कराळे यानेच आरोपीला माहिती दिली आहे.

सुतावरुन स्वर्ग गाठण्यात व तपासाच्या सर्व गुणवत्ते (स्कील) मध्ये तरबेज असलेले पोउपनि गिरीष तोगरवाड, पोना. सुनिल पवार, संतोष पाईकराव, शंकर दाभाडे, पोशि. प्रशांत राजगुरु, रामेश्वर जोगदंड, रमेश

गोडघासे या टिमने उमेश कराळेला खाकी चा खाक्या दाखविताच त्याने बोलण्यास सुरूवात केली.

विश्वेश सराफ यांची दोन दुकाने आहेत एक डोणगांव मध्ये आणि दुसरे केनवड मध्ये उमेश कराळे हा डो
मधील दुकानात काम करायचा केनवडच्या दुकानामध्ये काम करीत असलेला दिलीप मैंद व गणेश लहाने हे दुकान
सोन्याच्या व चांदीचा माल बॅग मध्ये भरुन मोटर सायकलने डोणगांवला घेउन येतात त्यांना लुटणे सोपे आहे असे
डोणगावमधील त्याचा मित्र सुशांत याला माहिती देउन त्याचे सहमतीने योजना तयार केली. यवतमाळ येथील राह
रमेश गोळे व त्याचा साथीदार अजय कुन्हे याचे मदतीने ती पार पाडली.

रमेश गोळे हा सराईत गुन्हेगार Cyber मधील Hacker आहे. कराटेचा ब्लॅक बेल्ट असणारा रमेश अ
चपळ असून त्याचेकडे नेहमी शस्त्र असते आणि तो पोलीसांवर हल्ला करणेच्या सवयीचा आहे, अशी माहिती मि
तसेच त्याचा साथीदार अजय हा नुकताच खुनाच्या गुन्ह्यातून जेल मधून बाहेर पडला असून यवतमाळ मधील कुख्या
आहे व तो शस्त्र बाळगून असतो अशी माहिती मिळाल्यावर मा.पो.अधिक्षक पाटील मॅडम, मा.अति पो.अधिक्षक र
गोरे मॅडम व स्थागुशा पोनि डुकरे पाटील यांनी रमेश गोळेला पकडण्यासाठी योजना तयार केली. गुन्हेगार हा C
Crime मधील Master होता. त्याने त्याचे मोबाईल, सिम कार्ड, Facebook, What's app केव्हाचे बंद करून ट
होते.

मनुष्य सवयीचा गुलाम असतो. मोबाईल बदलला, सिमकार्ड बदलले तरी त्यांचे मित्र, प्रेमिका/पत्नी,
वडील तेच राहतात त्याची जाण्या येण्याची ठिकाणे पण तीच राहतात.

वाशिम सायबर सेलचे सपोनि वाढवे, प्रदिप डाखोरे व दिपक घुगे यांनी तंत्रशुद्ध तपास करून रमेश ग
लोकेशन शोधून काढले.रमेश गोळेला पकडण्यासाठी तपास पथक वेशांतर करून मंदीर परिसरात दोन दिवस राहिले
रात्री १.०० वाजता आला. पण कमीत कमी रिस्क आणि शंभर टक्के रिझल्ट यासाठी आग्रही असले
पी.एस.आय.तोगरवाड आणि पथकाने त्याला झोपेतच घेरले, वेगाने हालचाली करत त्याच्या साथीदारालाही वि
उजाडण्याच्या आत ताब्यात घेतले.

हा मायावी आरोपी यवतमाळ जवळील चौसाळा जंगलामध्ये एक शंकराच्या मंदीरामध्ये पोथी वाचायचा 'भ
या टोपण नावाने तो तेथे वावरायचा त्याला पकडणे जिकरीचे तसेच धोक्याचेही होते.

रमेश गोळे उर्फ भोळ्या यास तो झोपत असतानाच पहाटे जेरबंद केला. रितसर अटक केला पण कस
गुन्हेगार तो पोलीसांना कोणत्याच प्रकारे Clue देत नव्हता.

घोडा जरी 36 नखरेवाला असला तरी, घोड्यावर बसणारा 37 नखऱ्यांचा असतो या पंखतीनुसार शि
पोलीस स्टेशन चे ठाणेदार गवळी, पोउपनि गिरीष तोगरवाड व पथकाने आपले कौशल्य पणास लावत रोशनला बो
केला. रमेशने पूर्ण कहाणी सांगत जबरीचे लुटून नेलेली दागिण्याची बॅग यवतमाळ जिल्हयातील चौसाळा ये
जंगलातील एका गुफेमध्ये ठेवली असल्याचे सांगितले.रमेशला घेवून जेव्हा पथक यवतमाळच्या चौसाळा जंगलात



अंगावर शहारे आणणारे असे ते ठिकाण होते. चौसाळा येथून २२ कि.मि.अंतरावर निर्मनुष्य जंगलात जेथे हिंस्त्र श्वापदांचा आजही उघड वावर आहे. तेथे अनेक छोट्या मोठ्या गुफा आहेत. पैकी एका गुफेमध्ये त्याने बॅग लपविल्याचे सांगितले.गुफेमध्ये सर्वत्र अंधार,सापाची भिती अशा परिस्थितीत दागिण्याची बॅग ताब्यात घेण्यात आली.गुन्ह्यातील फिर्यादी विश्वेश सराफ यांनी पोलीस विभागावर पूर्ण विश्वास ठेऊन शांततेचे सहकार्य केले. आणि अशा रितीने अत्यंत रोमहर्षक तपासाचा शेवट गोड झाला. विश्वेश सराफ यांना समारंभपूर्वक त्यांचे लुटलेले १००% सोने चांदीचे दागिने परत करण्यात आले. वाशिम जिल्हा पोलीस दलाचे मा.DG साहेब, IG साहेब तसेच मिडिया व सर्वसामान्य नागरीक यांचेकडून कौतुक करण्यात आले.



शुभेच्छांसह

**पोनि. हरिष गवळी**

शिरपूर पोलीस स्टेशन



## माझे मत



आपल्या सगळ्यांनाच वाटते की, शिवाजी महाराजांनी पुन्हा एकदा जन्म घ्यावा; पण तो ही दुसऱ्याच्या घरी. परंतु आता आपल्याला या प्रवृत्तीला तिलांजली देण्याची स्वतःहून स्वतःमधे बदल घडवण्याची वेळ आली आहे. नाही तर समाजातील इतर घटकाना दोष देण्याचा तुम्हा-आम्हांला कोणताच अधिकार नाही.

दि.२९/७/०१७ ला माझ्या सोन्या-चांदीच्या केनवड शाखेच्या सहकाऱ्याबरोबर घडलेल्या धाडसी दरोड्या मुळे आयुष्यात प्रथमच पोलिस ठाणे व तेथील जीवापाड काम करणाऱ्या मानवी यंत्रा चा सलग ३-३ रात्रदिवस जागणाऱ्या, जीवाचे रान करणाऱ्या , मानवी भूतांचा अतिशय जवळून, अतिशय चांगला अनुभव आला.

सर्व प्रथम मी वाशिम SP पाटील मॅडम, श्री इुकरे साहेब,शिरपूर पोलिस स्टेशन ठाणेदार श्री गवळी साहेब व त्यांचे सर्व सहकारी यांचा मनःपूर्वक आभार मानतो. त्यांच्या जिद्द व आत्मियते मुळेच हा गुन्हा उघडकिस आला. पण् मला सांगा या देशाचा एक सुजान जबाबदार नागरीक म्हणून आपली काहीच कर्तव्य व जबाबदारी नाही का?

ती झालेली घटना रस्त्यावरील दोन्ही बाजूच्या जबाबदार नागरिकांनी आपल्या डोळ्यादेखत घडताना बघितली परंतु कोणीही साधा फोन करुन किंवा इतर कोणत्याही प्रकारे सांगून प्रशासनाची मदत करण्याची तयारी दर्शवली नाही यात त्यांचा काही दोष नाही. या आधी माझी सुध्दा हिच मानसिकता होती पण आज आपण एक गोष्ट विसरत आहोत, आज मी आहे तर उद्या तुम्ही किंवा तुमचे कोणी, परवा अजून कोणी असू शकतो. आपल्या या निगरगट्ट बनत चाललेल्या स्वभावामुळेच चोरांची हिम्मत व चोरीचे प्रमाण वाढत आहे. जेव्हा एखादी घटना घडते त्या क्षणाला अधिकाऱ्यांसमोर कोणतीही information नसते. अवती-भोवती असतात ते हताश निराश भकास चेहरे Technology च्या युगात whatsapp,face book च्या अति वापरात माणुसकी हरवत चाललेलो आपण सर्व शिवाय वरिष्ठ अधिकाऱ्यांचा येत असलेला दबाव. समाजात पणाला लगलेली image एकाच वेळी अनेक आघाड्यावर निर्भिडपणे लढत अतिशय कमी स्टाफसह तोडक्या यंत्रनेसह घरातील लहान-मोठी मुले ,आई, वडील,बायको यांचा जाणीव पूर्वक विसर करत अतिशय कमी वेळात गुन्हा उघडकिस आणने ही फार अभिमानस्पद कौतूकास्पद बाब आहे.

आज माझ्या आई वडिलांचे घरातील सर्वांचेच काही पुण्य कर्म असतील म्हणूनच आज हे चित्र दिसते आहे. परंतु दरवेळेस अशीच परिस्थिती राहील असे सांगता येत नाही. Mobile Computer च्या वाढत चाललेल्या गैरवापरात आपल्याला पण् बदलने आहे. प्रत्येकाने आपल्या प्रतिष्ठानात आत बाहेर चांगल्या CCTV Camera लावणे गरजेचे आहे. समजलेल्या, बघितलेल्या घटनेची कोणत्या न कोणत्या प्रकारे माहिती पोलीसांना देणे आपले कर्तव्यच आहे, ही भावना आपल्या मनात निर्माण करणे भाग आहे.

तुम्ही केलेल्या एका फोनमुळे कोणाचा तरी जीव वाचू शकतो तर कोणी आयुष्यातून, व्यापरातुन उठता - उठता वाचू शकतो. आपण केलेल्या सहकार्यामुळेच गुन्हा उघडकीस आणण्यासाठी व पर्यायाने गुन्हेगारी कमी करण्यास मदतच होईल. माझ्या केस मध्ये SP मॅडम यांच्या योग्य मार्गदर्शनामुळे व Add.SP गोरे मॅडम,ठाणेदार श्री गवळी साहेब,PSI श्री तोगरवाड साहेब, सुनील पवार,प्रशांत राजगुरु, संतोष पाईकराव, रामेश्वर जोगदंड, शंकर दाभाडे, रमेश घोडघासे व सर्व शिरपूर पोलिस स्टेशन नी खूप मेहनत घेतली त्या बद्दल त्यांचे आभार मानतो.

**विश्वेश सराफ**
सराफा व्यापारी,होणगांव



## बदलती नाती व वाढती गुन्हेगारी

परवा एका महाविद्यालयातून समजलेली गोष्ट. एका वस्तीगृहात राहणाऱ्या मुलीवर तिच्या मैत्रिणीने चोरीचा आरोप केला. त्या मुलीला रेक्टरने बोलता केला तेव्हा समजलं घरी आई वडील दोघं नोकरी करतात, पण मुलीला वेळेवर पैसेच पाठवत नाहीत. मग चोरीशिवाय दुसरा पर्याय नाही.

एका अकरावीच्या मुलीने मनगटावर करकटक ने 'एस' हे अक्षर कोरुन घेतलं. पालकांना बोलावलं तर उलट निरोप आला त्यांना यायला वेळ नाही. मुलीला तुम्हीच काय ती शिक्षा द्या आणि प्रकरण मिटवा.

एका मुलाने वाचन कक्षामध्ये हाताची नस कापून घेतली. अशी एक दोन काय अलिकडे वाढती प्रकरणे कानावर येतात. तेव्हा समजतं की लाईफ बिझी झालंय. मुलांना थोडा मोठा व्हायला वेळ नाही, पालकांना लक्षद्यायला वेळ नाही.

विषयाला अनुसरुन लिहितांना संभ्रम असा होत आहे की, नाते संबंध दुरावतात म्हणून गुन्हेगारी वाढत आहे कि, दुसऱ्या बाजुने मुलांकडून अती अपेक्षा केल्याने गुन्हेगारी वाढत आहे? दोन्ही बाजूने विचार होणे आवश्यक आहे. घरात मूल जन्माला आले की, त्यांचे किती गोड कौतुक होते.

आजकाल बहुतेक आई वडील शिकलेले आहेत याचा अर्थ ते सुसंस्कृत आहेत असे म्हणता येणार नाही. मुळात साक्षर असणं आणि सुसंस्कृत असणं यात फार मोठा फरक असू शकतो. काही निरक्षर व्यक्ती सद्धा सुसंस्कृत असू शकतात.

एक तर स्वतःचे लग्न झाल्याबरोबर वेगळे राहण्याची प्रवृत्ती, आई वडिलांची जबाबदारी टाळण्याची प्रवृत्ती, आपले आई वडील खेडूत, गावंढळ आहेत. त्यांच्यामुळे आपल्या मुलांवर संस्कार होणार नाहीत असे वाटणे यातून पहिल्यांदा नाती दूर व्हायला सुरुवात होते. शहरी आणि ग्रामीण हा वाद ही इथेच सुरु होतो. शेवटी शहरे मोठी कोणी केली, तर ग्रामीण भागातील स्थलांतरीत लोकांनीच ना.

शहरात स्थायिक झाल्यावर पहिली समस्या राहण्याची. स्वतःचे घर असावे, स्वतःची एक गाडी असावी, विक एंड ला बाहेर जेवायला जावे, कधीतरी पिकनिक पार्टी करावी, अशा अनेक आकर्षणांना माणूस बळी पडत जातो. कर्ज बाजारी होतो आणि त्यातून एखादा गुन्हा त्यांच्या हातून घडतो हा गुन्हेगारीचा पहिला टप्पा.

आता दुसरा टप्पा मला काहीसा वेगळा वाटतो. आपण आयुष्यात फार काही करु शकलो नाही, मग आपल्या मुलांनी ते करावं या मानसिकतेने ग्रासलेले काही लोक असतात. मूल जन्माला आले की, ते इंजिनीअर होणार की डॉक्टर हे आई-वडील ठरवून मोकळे होतात. मग त्या दृष्टीनेच त्या घराचा प्रवास सुरु होतो. त्याला पाहिजे त्या क्लास ला पाठवण, महागडी शाळा, तिथला न झेपणारा खर्च, मुलांचे हाय फाय मित्र, मग त्यांचे हाय फाय राहणीमान, सगळच झेपण्याच्या पलीकडचं असत. अशा मुलांकडून पालकांच्या अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत की वाद विकोपाला जातात. इथे मुले गुन्हेगार बनण्याची जास्त शक्यता असते.

छोटी होत जाणारी कुंटुबे, वाढत्या अपेक्षा, आर्थिक आणि मानसिक स्तरावर होणारी ओढाताण, आणि कुटुंबामधील वाढता तणाव, या सगळ्या गोष्टी आज समाजाला गुन्हेगारी करण्यास प्रवृत्त करत आहेत. बऱ्याच वेळी एक गुन्हा करुन जर आपल्याला काही मिळत असेल तर करायला काय हरकत आहे ही भावना ही समजून घेणे महत्वाचे आहे.

कॉलेज जीवनात प्रेम या शब्दाखाली या नात्याला सुरवात होते आणि नंतर 'ढाई अक्षर प्यार के', 'प्रेम आंधळ असतं' अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली नैतिकतेची बंधने झुगारली जातात. Kissing Day, Hug Day, Valentine Day अशा दिवसामुळे याला उघड-उघड प्रोत्साहन दिले जाते. याचाच परिणाम म्हणून आता बऱ्याच ठिकाणी Love Point, Couple Point च्या नावाखाली लैंगिक चाळे सुरु असतात. प्रेम म्हणजे शरीर संबध आलेच की, असा ही खुलासा केला जातो. या वयात आकर्षण असणार हे समजू शकतो पण काळजी घेणं, जबाबदारी स्वीकारणे, सन्मान करणे व समजून घेणे म्हणजे प्रेम असत की फक्त शरीरसंबंध पुरते मर्यादित असत ते प्रेम? आपण आपल्या मनावर, भावनांवर थोडेही नियंत्रण मिळवू शकत नाही का?

आजकाल प्रत्येक गोष्ट करण्याच वय खाली येऊ लागलंय१०० वर्षाच आयुष्य १० वर्षात जगण्याची मानसिकता आढळून येत आहे. काही वर्षापूर्वी पोर्नोग्राफी मॅगझिन १४-१५ व्या वर्षी चाळलं जायचं व ते ही एखादा मुलगा पाहू शकायचा. पण आजकाल सर्व अगदी Easily उपलब्ध आहे. त्यामुळे शरीर व हार्मोनिक लैंगिक अनुभवासाठी लवकर Mature होतात.

मुलाचं प्रमाणाबाहेर इंटरनेट वापरणे, अगदी कोवळ्या वयात नको त्या संगती, पालकांचे दूर्लक्ष यांच्या जोडीला T.V. व सिनेमा आहेच. एकंदरीतच काय उत्तेजित करणारी दृष्य प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे. पुस्तकात वाचलंय, सिनेमात बघितलंय मग करुन बघायला काय हरकत आहे अशी प्रवृत्ती वाढत आहे. त्याला वेळीच आवर घालायला हवा. आजकालचे सुज्ञ पालक मुलामुलींच्या एकत्र असण्याला, घरी उशीरा येण्याला विरोध करीत नाहीत आणि नेमका यांचा फायदा आजची पीढी घेत आहे. पूर्वीचं जुनं घड्याळ नवीन पिढीनं बदललं. ते आता कितीतरी पटीनं वेगान पळतंय, पण त्याचे काटे जर योग्य पध्दतीने पुढे सरकले नाहीत, तर आयुष्याचे बारा वाजतात हे ही लक्षात घ्यायला हवे.

वय वेडं असत, पण वेड्या मनाला शहाणं ठेवणार मन असतंच ना! या वयाला योग्य रितीने हाताळण्याची गरज आहे.

आज ज्या पध्दतीने गुन्हेगारीचे स्वरुप झपाट्याने वाढत चाललेले आहेत. त्यावरुन नात्यांमध्ये पडलेले अंतर व कमी झालेल्या संवादाचे दुष्परिणाम आहेत. युवापिढीमध्ये वाढत चाललेला चंगळवाद व हरवत चाललेली सद्सद्विवेकबुध्दी त्यामुळे येणाऱ्या भविष्यकाळात पश्चाताप करण्याची वेळ आल्याशिवाय राहणार नाही.

कृती करुन विचार करण्याला काहीही अर्थ नाही, विचार करुन कृती केल्यास पश्चाताप होणार नाही. मी असंही म्हणत नाही की सर्व आधुनिकीकरण वाईट आहे. किंवा जुन्या रुढी परंपरा चागल्या आहेत मात्र दोन्हीचा सर्वांगं सुंदर मेळ घालून निर्माण होणाऱ्या संस्काराची आजच्या पिढीला गरज आहे.
आणि या गोष्टीचे भान आणि जाण ठेवल्यास आपोआपच कायद्याचा नियमांचा व संस्कृतीचा मान राहील एवढीच प्रामाणिक अपेक्षा।




**रामराजे चांदणे**
तुरुंग अधिक्षक, वाशिम




# भेट

पोलीसांना आपले कर्तव्य पार पाडत असतांना बहुआयामी अशी आपली भुमिका पार पाडावी लागते.कोणी त्याचे घरी चोरी झाल्याची तक्रार घेऊन आलेला असतो, तर कोणाला त्याचे अतिजवळच्या विश्वासू मित्राने त्याची फसवणूक केल्याची गऱ्हानी घेऊन समोर उभा ठाकतो. तर कोणी ज्या भावंडाने त्यास लहानपणी अंगाखांद्यावर खेळवले व लहानपणी एक घास खाऊ दोघांनी मिळून खाल्ला व चिमणीच्या दाताने खाऊ वाटून खाल्ला अशा भावंडाचे विरुध्द वडीलोपार्जित ईस्टेटीच्या वादाची त्याची व्यथा मांडत असतो. अशाच वेळी एखादी बाई बापडी तिचे पतीचे, मुलाबाळांचे विरुध्दची त्रासाची व त्राग्याची हकिकत सांगत असते. अशा एक ना अनेक प्रकारच्या मानसिकतेतून आपले कर्तव्याचे मार्गक्रमण करतांनाच अचानक त्याचे समोर कायदा सुव्यवस्थतेचा बंदोबस्त, व्ही.आय.पी. दौरा बंदोबस्त,महापुरुषांच्या जयंती पुण्यातिथीचे बंदोबस्त,देवी दैवतांच्या, यात्रा - जत्रा तसेच सण-सनावळीचे बंदोबस्त अशी एक ना अनेक कामे त्याचे समोर उभी ठाकलेली असतात. या सर्व व्यापामुळे त्याचे मन व मानसिकता सैरभैर होणे किंवा त्याचे वागण्याबोलण्यात चिडचिडेपणा येणे स्वाभाविकच आहे.

दि.२५/८/२०१७ रोजी श्री गणेश आगमनाची सर्वजण आतुरतेने वाट पाहात होते. अर्थातच गणेश स्थापनेच्या या दिवशी मी सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सूचना देऊन बंदोबस्ताकरिता पोलीस स्टेशन हद्दीतील वेगवेगळया गावामध्ये रवाना केले. पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीणचे कर्मचारी संजय क्षिरसागर यांची ड्युटी तोंडगाव येथे लागली, असता तेही मोटार सायकलने त्यांचे कर्तव्याचे ठिकाणी रवाना झाले. तोंडगाव येथे जात असतांना वाशिम-हिंगोली हायवे वरील सायखेडा ते राजगाव गावाच्या दरम्यान रोडचे बाजूचे एका झुडपात त्यांना एक तरुणी दिसून आली त्या तरुणीचे जवळ तीन ते चार युवक तेथे उभे असलेले त्यांना दिसले. त्यावेळी संजय क्षिरसागर यांनी कर्तव्याचा कटाक्ष म्हणून त्या तरुणीची आस्थापूर्वक विचारणा केली.तेथे जामा झालेले लोक ती वेडसर आहे म्हणून तिचेकडे दूर्लक्ष करु लागले, जसे की, वेड्याचे जगण्याला काहीच किंमत नसते. परंतु संजय क्षिरसागर यांनी विचारपूस केल्यानंतर त्यांचे नजरेतून तिची असहाय्यता व आगतिकता त्यांचे नजरेत आली. तिचे शारिरीक अवस्थेवरुन ती भुकेली असल्याचे जाणून धाब्यावरुन जेवण बोलावून घेऊन तिला जेवु घातले व त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता, ही मला फोन द्वारे ही माहिती दिली. मी ही विनाविलंब पोलीस स्टेशनचे महिला कर्मचारी पाठवून या तरुणीस पोलीस ठाण्यात आणून तिच्या प्राथमिक औषधोपचाराची व्यवस्था केली. तसेच तिला प्रेमाने तिची आस्थेने विचारपूस करण्याचा प्रयत्न केला. परंतु ती काहीही सांगू शकत नव्हती. तिचे हातावर तिचे स्वत:चे आई वडील व भाई-बहीण यांची नांवे गोंदलेली होती. आडनाव कोठेही नव्हते. परंतु तिचा पत्ता मिळून यावा यासाठी वेगवेगळ्या गावांचे शहरांचे नावाचा उल्लेख तिचे समोर केला त्यावेळी रिसोड शहराचे नाव उच्चारताच तिचे चेहऱ्यावरील हाव-भाव बदलले. ही बाब कर्मचाऱ्यांच्या चाणाक्ष नजरेतून सुटली नाही व त्यांनी तिचे रिसोड येथील नातेवाईकांचा शोध घेऊन तिचे नातेवाईकांना पोलीस स्टेशनला बोलावून घेतले. तिचे नातेवाईक पोलीस स्टेशनला आल्यानंतर त्या तरुणीची व तिचे आईवडीलांची नजराभेट झाल्यानंतर भटकलेल्या हरीणाच्या पाडसाने हरिणीस बिलगावे किंवा पाडसाच्या विरहानंतरच्या भेटीनंतर हरीणाने पाडसास कुरवाळावे त्या प्रमाणे ती तरुणी व तिचे आई-वडील एकमेकांना अलिंगण देऊन ती आणि आई-वडील ओक्साबोक्सी रडू लागले. सदर तरुणी ही दोन दिवसापासून घरुन निघून गेलेली होती. ही घटना पाहून पाषाणालाही पाझर न फुटल्यास नवलच म्हणावे हे


कॉफी विथ पोलीस


एक दृष्टीक्षेप

भेटीचे दृष्य पाहुन पोलीस स्टेशनचे अधिकारी कर्मचारी तसेच उपस्थितांचे डोळेसद्धा पाणावले. एकीकडे समाजातील माणुसकी नाहिशी होत असतांना, त्यातच पोलीस सामान्यांचे अपप्रचाराला बळी पडत असतांना पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीण येथील कर्मचारी/अधिकारी- नापोकॉं.संजय क्षिरसागर, पोउपनि. अनिल मानेकर, नापोकॉं.सुभाष बोरकर, महिला पोलीस लीनता ढवळे, पोकॉं.दिलीप राठोड,होमगार्ड दिलीप कोंगे यांनी या तरुणीचे व तिच्या नातेवाईकाचे मिलन घडवून पोलीसातील माणसाचा परिचय करुन दिला ही बाब पोलीसांची प्रतिमा उंचावणारी व पोलीसांकरिता प्रेरणादायी व अभिमानास्पद आहे.




**सुनिल अंबुलकर**
(सहाय्यक पोलीस निरिक्षक)
ठाणेदार पो.स्टे.वाशिम ग्रामीण





# पोलीस दादा...!




**सुनिल अंबुलकर**
(सहाय्यक पोलीस निरिक्षक)
ठाणेदार पो.स्टे.वाशिम ग्रामीण

पोलीस दादा तुला सलाम माझा,
तुझ्या आस्तित्वाने समाज भयमुक्त झाला।।
गुलामित नको जिणे कुणाचे ना तिमिराची तमा तुला ।।

तुझ्या जागराने दिशा भयमुक्त दाही,
प्रत्येक संकटाला आठवण तुझीच येई ।।
संकटही येई शरण असा तुझा दरारा,
पोलीस दादा तुला सलाम माझा,

तुझ्या आस्तित्त्वाने समाज भयमुक्त झाला।।
समाजातील अपप्रवृत्तीचे वार झेलण्यास तु सज्ज सदा।।
उधळुन लावले दुर्जनाचे मनसुबे अखंड ठेवण्या देश माझा।।
कीतीही असू दे श्रीमंत कीतीही असू दे दांडगा,
तुझ्या एका हाकेने सुटतो घाम त्याला ।।

हास्य दिले तु ईतरांना भोगुन स्वतः यातना,
पर्वा नसे तुला कौतुक असो वा नसो जना ।।
पोलीस दादा तुला सलाम माझा,
तुझ्या आस्तित्वाने समाज भयमुक्त झाला ।।



# .....आणि प्रेत बोलू लागले !



दि.०२/०१/२०१७ रोजी हिवाळ्याच्या गारठ्यात पोस्टे आसेगाव जिल्हा वाशिम अंतर्गत ग्राम देपुळ येथील सौ.कमला (नाव बदललेले आहे) वय २२ वर्ष ही महिला पोस्टे आसेगाव येथे येऊन तिची आई राधाबाई, वय ४० वर्ष (नाव बदललेले आहे) रा. ग्राम गव्हा जिल्हा परभणी ही दि.२६/१२/२०१६ रोजी तिला पाहण्यासाठी ग्राम देपूळ येथे आली होती. २ दिवस राहिल्यानंतर ती दि.२८/१२/२०१६ रोजी दुपारी ०२.०० वा. तिचे घरुन ग्राम गव्हा जिल्हा परभणी साठी गेली होती. परंतु ती ग्राम गव्हा येथे पोहचली नाही म्हणून दि.३१/१२/२०१६ रोजी कमला हिचा भाऊ याने फोनद्वारे माहिती दिली की, त्यांची आई राधाबाई ही आद्याप पावेतो घरी पोहचली नाही, इतर नातेवाईकांकडे शोध घेतला असता ती मिळून येत नाही. अशा आशयाची व तिच्या वर्णनाशिशीची तक्रार देण्यात आली. आसेगाव पोलीसांनी लागलीच मिसींग रजिस्टर ला नोंद घेवून तिचा शोध घेण्याबाबत कायदेशीर कार्यवाहीस सुरुवात केली.

दि.१५/०१/२०१७ रोजी गणपत पुंडलिकराव घुगे, वय ३२ वर्ष, रा. मैराळडोह यांनी पो.स्टे. जऊळका येथे माहिती दिली की, त्यांच्या गावानजीकच्या वाघामाय संस्थानाचे जवळ शेती असून दुपारी ०२.०० वा. चे सुमारास शेतीच्या जवळच असलेल्या धरणाच्या पाणी साठ्यावर पाणी पिण्याकरीता गेले असता, धरणाच्या कालव्याच्या सादोरीत एक उघड्या अवस्थेत एका महिलेचे प्रेत तरंगतांना दिसत आहे. वरुन जऊळका पोलींसांनी घटनास्थळी जाऊन सदरहु प्रेताची पाहणी करुन त्यावर पुढील कायदेशीर कार्यवाहीस सुरुवात केली. सदरहू प्रेत हे हिरवी साडी घातलेल्या स्त्रीचे, कुजलेल्या अवस्थेत, तिच्या मानेला दोरी गुंडाळलेली व तिचे हात पाय दोरीने बांधलेले व दोरीस मोठा दगड बांधुन घातपाताचा पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने सोनाळा धरणात टाकून दिल्याचे सकृतदर्शनी दिसून आले होते. प्रकरणी पोस्टे जऊळका येथे अप.क्र.११/२०१७ कलम ३०२,२०१ भा.द.वि. प्रमाणे गुन्हा अज्ञात आरोपीविरुध्द नोंद करण्यात आला होता. शवाचे घटनास्थळावर शवविच्छेदन करण्यात आले. प्रेत हे कुजलेले असल्याने व पाण्यात बऱ्याच दिवस असल्याने प्रेताची ओळख पटत नव्हती. शवविच्छेदन अहवालावर वैद्यकिय अधिकारी यांनी प्रेत कुजलेले असल्याने अभिप्राय देता येत नाही अशा शेरा दिल्यामुळे चौकशी करण्याऱ्या अधिकाऱ्याकडे मोठे आव्हान निर्माण झाले. याचदरम्यान पो.स्टे. आसेगावचे ठाणेदार यांना सदरहू अनोळखी स्त्रीच्या मृत्यूबाबत माहिती मिळाली. त्यांनी एक तपासाचा भाग म्हणून त्यांचेकडील मिसींग असलेली राधाबाई बद्दल चौकशी करण्यासाठी सौ.कमला हिला पाठविले. कमला हिने ते प्रेत तिचे आईचेच आहे हे साडी व गळ्यातील माळ व चाबीवरुन ओळखले. प्रेताची ओळख पटल्यानंतर राधाबाई हिचा मृत्यू कोणी घडवून आणला याबाबत चौकशी सुरु झाली.

चौकशी दरम्यान सौ.कमला हिने पोलीसांना महत्त्वाची माहिती दिली की, तिचा पती राहूल याचेविरुध्द तिने सेलू मानवत जिल्हा परभणी खावटीची केस दाखल केली होती. त्यांचेमध्ये सासरी नांदण्यावरुन नेहमीच वाद व्हायचा. याच दरम्यान तिचे आईचे गावातील राजेश नावाचे इसमासोबत ओळख होती व त्याची तिचे आईवर वाईट नजर होती. राहूल हा खावटीची केस मागे घेण्याबाबत दबाव टाकत होता. यामुळे या दोघांनी तिचे आईचा मृत्यू घडवून आणला असावा अशी शंका उपस्थित केली होती. जऊळका पोलीसांनी याबाबत अधिक चौकशी केली. परंतु त्यांना गुन्हेगारांचा



ठावठिकाणा लागत नव्हता सदरहू गुन्ह्यांच्या अन्वेषणा दरम्यान अनेक साक्षीदारांना बोलविण्यात आले. त्यांची चौकशी, उलट तपासणी करण्यात आली. परंतु गुन्हा उघडकीस येत नव्हता. स्थानिक पोलीस प्रयत्न करुनही त्यांना अपेक्षित यश मिळत नव्हते. गावातील दोन प्रत्यक्षदर्शी साक्षीदार हे राधाबाई दि.२८/१२/२०१६ रोजी ॲटो मध्ये बसून वाशीम पर्यंत तिचे गावी जात असल्याचे सांगत होते व राधाबाईचे प्रेत दि.१५/१/२०१७ रोजी आढळून आल्याने मधल्या १५ दिवसात राधाबाई कोठे होती यांचे उत्तर स्थानिक पोलीसांना मिळत नव्हते. आश्चर्य म्हणजे राधाबाई विषयी तपासामध्ये वेगवेगळी संशयास्पद व आक्षेपार्ह माहिती समोर येत होती. त्यामुळे तिचा खून कोणी व का केला ?यांचे उत्तर शोधतांना स्थानिक पोलीस चक्रावून गेले होते.राधाबाईचा खून कोणत्या कारणासाठी झाला असावा, याचा तर्क बांधून तीन -चार महत्त्वाच्या बाबी समोर येवून त्यावर वेगवेगळी पथके तपास करु लागली परंतु पोलीसांना अद्यापही यश व प्रकरण थंड बस्त्यातच पडून राहीले होते.

जिल्हा पोलीस अधिक्षक मोक्षदा पाटील यांनी जिल्ह्याचा प्रभार हाती घेतल्यानंतर एका पाठोपाठ असे गुन्हे उघडकिस आणण्याची मोहीमच होती घेतली होती व स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकांकडे अशा क्लिष्ट गुन्ह्यांचा तपास सोपवून त्यांचेकडुन अशा प्रकारचे गुन्हे उघडकीस आणण्यात त्यांना यश प्राप्त झाले होते. जऊळका येथील वरील गुन्ह्यांचा समांतर तपास करण्याचा आदेश जिल्हा पोलीस अधिक्षक मा. मोक्षदा पाटील यांनी आम्हास दिले होते. आमच्या पथकामध्ये सपोनि. वाढवे,पोउपनि. इंगळे व स्था.गु.शा. मधील अशा गुन्हयांमध्ये अन्वेषणाचा अनुभव असलेल्या कर्मचाऱ्याचा समावेश होता. यातील गावातील दोन बनावट साक्षीदार जे सुरुवातीपासुन राधाबाई ही दि.२८/१२/१६रोजी त्यांचे सोबत वाशिम येथे ॲटो मध्ये बसून आली होती. असे सांगणारे यांची उलट तपासणी केली असता, ते दि.२८/१२/१६ रोजी गावातच होते, ही बाब सर्वप्रथम स्पष्ट झाली यामुळे आम्हास गुन्हा उघडकीस येण्याची आशेची किरणे दिसू लागली. घटनास्थळाच्या निरीक्षणावरुन असे लक्षात आले की घटना स्थळ हे अतिशय निर्जन भागात असून या परिसरात नवरात्राचे दिवस खेरीज करुन दिवसाही कोणी फिरकत नाही. त्यामुळे या प्रकरणातील खुनी आपल्या भागातील असावा अशी आमची पक्की खात्री झाली. खोटे बोलणारे साक्षीदार याच हे सुरुवातीस ताकास तूर लागू देत नव्हते परंतु पोलीसी प्रश्नाचा भडीमार ,त्यांच्या कथनातील विसंगती वे पोलीसी खाक्या यापुढे त्यांचा टिकाव लागला नाही. कमलाचा नवरा राहूल यांचे सोबत त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध असल्याने व राहुल हा साधा सरळ व्यक्ती असल्याची गावात माहिती असल्याने व तो असे काही करेल. अशी शंका त्यांना नसल्याने त्यांनी पोलीसांसमोर राहुलच्या सांगण्यावरुन असे बयान देण्याचे कबूल केले. या धाग्यावरुन तपासाची दिशा ठरवुन आम्ही व आमचे पथकाने राहूल याची चौकशी सुरु केली. परंतु त्यांचे मोबाईल लोकेशन मिळत नव्हते व या गुन्हयातील पुर्वीचा अंदाज कामी येत नव्हता यापुर्वीच्या अधिकाऱ्यांनी चौकशी वरुन राधाबाई ही घरुन निघाल्यावर ५-६ दिवस कुठे तरी थाबलेली आहे. ही बाबच आम्हास पटत नव्हती. चौकशी अधिकाऱ्याने काढलेला निष्कर्ष सतत चुकीचा वाटत होता त्यामुळे आम्ही परत एकदा शवविच्छेदन अहवालाचे बारकाईने अवलोकन केले असता, त्यामध्ये आम्हांस आमच्या मतास पटेल अशा बाबी आढळून आल्या. मेडीकल ज्युरीस प्रूडंस ॲन्ड टाक्सालॉजी यामधील ड्राव्हूनींग प्रकरणाबाबत अद्ययावत माहिती घेतली. यातील तज्ञांसोबत चर्चा केली असता असे दिसून आले की, हिवाळ्याच्या दिवसात पाण्याखाली १५ दिवस देखील